www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 247 वा गुरुवार दि. 22 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## लोहगाव शिवारात अंगावर विज पडून मेंढपाळ महिलेचा मृत्यू.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



पैठण तालुक्यातील लोहगाव येथून जवळच असलेल्या मावस गव्हाण, मानकापूर येथील शिवारात धरण क्षेत्रात सोमवारी सायंकाळी झालेल्या जोरदार अवकाळी पावसात मेंढपाळ महीलेच्या अंगावर विज पडून मृत्यू झाला.प्रियंका अंबादास काळे असे या दूर्दैवी महीलेचे नाव आहे. याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, लोहगाव शिवारात जायकवाडी बँकवाटर क्षेत्रात चारा पाण्याची सोय होत असल्याने उन्हाळ्यात दर वर्षी परजिल्ह्यातील मेंढपाळ हे आपल्या पशूधनाच्या कळपासह डेरेदाखल होऊन राहूट्या टाकून राहत असतात. यंदा ही दहा पंधरा दिवसांपासून आलेले हे कुटुंब राहूट्या ठोकून राहत असताना अचानक सोमवारी सायंकाळी आलेल्या अवकाळी पावसात वाऱ्याने राहुटी उडाल्याने पालाची खुटी ठोकण्यासाठी बाहेर आलेल्या प्रियांका अंबादास काळे, वय २५ वर्षे राहणार काळेवाडी, ता. पाथर्डी, जिल्हा. अहिल्यानगर हल्ली मुक्काम लोहगाव शिवारातील मावसगव्हाण , मानकापूर ता.पैठण येथे दि. १९/०५२०२५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता अचानक पाऊस आल्याने अंगावर वीज पडून जागेवर मयत झाले आहे. सदर ठिकाणी मेंढपाळ म्हणून आलेले असून पोट भरण्यासाठी धरणाच्या काठावर मेंढ्या चारण्यासाठी आले होते.परंतू अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नैसर्गिक विज पडून मयत झाले आहेत. घटना घडल्यावर बिडकीन रुग्णालयात तपासणी करून वैद्यकीय अधिकारी डॉ.आसमा यांनी मयत घोषित करुन पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद बिडकीन पोलीस स्टेशनला नोंद घेण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली

**सहाय्यक फौजदार**
**सोमनाथ तांगडे हे तपास करीत आहे.**

सदरील घटनेतील मयत महीलेच्या पश्चात एक दिड वर्षाचा नुकताच आईचे दुध तुटलेला व एक दुसरीच्या इयत्तेत शिकणारा असे दोन मुले आहेत.

## रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्राचे आयोजन: केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:(आनंद पवार)**

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २८ जणांची क्रूर हत्या केली.या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दुर ऑपरेशन करून पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून १००पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले.देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्या प्रमाणे नेमके हेरून दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केली. दहशतवाद्यांना धडा शिकवला.भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून देशाचे संरक्षण करून शत्रू राष्ट्र पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. भारताचे दहशतवादाविरुद्ध युद्ध कायम राहील.भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना चांगला धडा शिकवला याबद्दल देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारतीय सैन्याने हाती घेतलेल्या सिन्दुर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबईत प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून आपले खंबीर नेतृत्व सिद्ध केले.भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे.भारताचे वायुदल नौदल आणि भूदल यांनी उत्कृष्ट कामगिरी अतुलनीय शौर्य दाखविल्याचे.आपल्या भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतीक म्हणून भारत जिंदाबाद यात्रा रिपब्लिकन पक्ष देशभर काढणार आहे.येत्या दि.२२मे,ते६जून पर्यंत देशभरात सर्व राज्यांत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात आणि तालुक्यात रिपब्लिकन पक्ष भारत जिंदाबाद यात्रा हाती तिरंगा ध्वज घेऊन काढण्यात येणार आहे अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी ही भारत जिंदाबाद यात्रा आप आपल्या भागात यशस्वी करावी.रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या भारत जिंदाबाद यात्रेत सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

## वाढदिवसानिमित्त प्रदीप भय्या राठोड यांचा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे सत्कार !

**दैनिक युवक आधार**



**छत्रपती संभाजीनगर:** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे कर्मचारी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस तसेच जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगरचे चेअरमन, दमदार व्यक्तिमत्व सर्वांचे लाडके जिल्हा परिषद प्रा. 3 चे अधीक्षक श्री. प्रदीप भय्या राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आज त्यांची भेट कार्यालयात जाऊन घेतली तसेच हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या परंपरेनुसार पुष्पगुच्छ ना देता पुस्तक आणि शाल देऊन सत्कार केले तसेच वाढदिवसानिमित शुभेच्छा दिल्या...

# भयंकर थरार! इंडिगोचे विमान सापडले गारपिटीच्या तडाख्यात

## प्रवाशांचा आक्रोश, विमानात प्रचंड गोंधळ

दिल्लीवरून श्रीनगरच्या दिशेने जात असलेल्या इंडिगोच्याविमानातील प्रवाशांना आयुष्यभर विसरता येणार नाही, असा प्रसंग घडला. विमानश्रीनगरच्या दिशेने जात असताना अचानक गारपिटीच्या वादळात सापडले.

गारांचा मारा इतका जोरात होता की, टर्ब्युलन्स निर्माण झाला. अचानक हे घडल्याने प्रवाशी जोरात ओरडायला आणि रडायला लागले. त्यामुळे विमानात प्रचंड गोंधळ झाला होता. दिल्लीवरून श्रीनगरकडे जात असलेल्या 6E2142 या विमानाला खराब हवामानाचा फटका बसला. दिल्लीवरून उड्डाण केल्यानंतर हे विमान सायंकाळी श्रीनगरच्या दिशेने निघाले होते. २२७ प्रवासी आणि विमानातील कर्मचारी घेऊन निघालेले हे रस्त्यातच गारपिटीच्या तडाख्यात सापडले.






**अन् प्रवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला**

गारांचा मारा आणि खराब हवामानामुळे दृश्यमानता कमी झाल्याने विमानाच्या प्रवासात अडथळा निर्माण झाला. त्यामुळे प्रवाशी घाबरले. प्रवाशांनी आरडाओरड सुरू केली. पण, वैमानिकांनी प्रसंगावधान दाखवत विमान सुरक्षितपणे श्रीनगर विमानतळावर उतरवले. विमानाचे नाक तुटले असले, तरी सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत.

या घटनेबद्दल इंडिगोनेही निवेदन जारी करून माहिती दिली आहे. गारपिटीच्या तडाख्यात विमान सापडले होते. पण, क्रू मेंबर्स आणि वैमानिकांनी प्रोटोकॉलचे पालन करत विमान सुरक्षितपणे श्रीनगरमध्ये उतरवले. विमानतळावरील टीमने प्रवाशांना सुखरुपपणे विमानतळावर नेले. विमान पाहणी आणि दुरुस्तीसाठी पाठवले जाणार आहे, असे इंडिगोने म्हटले आहे.

## पत्रकार माणिक कांबळे यांचा अभिष्टचिंतन सोहळा थाटात रुग्णांलयात फळे वाटप

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :**
**-जितेंद्र खोडे**

**मारेगाव:-** व्हाईस ऑफ मीडीयाचे वतीने पत्रकार माणिक कांबळे यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी शहरातील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. तहसीलदार उत्तम निलावाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या कार्यक्रमाला,मारेगाव पंचायत समीतीचे गटविकास अधिकारी भिमराव व्हनखंडे,मारेगाव नगरपंचायतीचे मुख्यकार्यकारी अधिकारी शशिकांत बाबर, पाणी पुरवठा विभागाचे अभियंता प्रफुल चिंतकुटलवार, ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक सुभाष इंगळे अखिल भारतीय सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अविनाश लांबट, सराटी चे सरपंच तुळशीराम कुमरे, ज्योतीबा पोटे पत्रकार,दिलदार शेख पत्रकार प्रामुख्याने उपस्थित होते.या उपक्रमाचे आयोजक व्हाईस आफ मिडीयाच्या जिल्हाध्यक्ष ,पत्रकार प्रतिभा तातेड , व्हाईस ऑफ मिडीया जि.महासचीव पत्रकार कविता धुर्वे व पत्रकार कैलास कोडापे यांनी यशस्वीरित्या नियोजन केले.सायंकाळी ७ वाजता फळे वाटप कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.विकास नागोरिया, डॉ.रविंद्र विणा,जयश्री इंगोले प्रभारी परीसेविका,मनिषा टोंगळे अधीपरीचारीका,सविता तंतलपाडे क्षकीरण, लिहीतकर पक्षसेवक, प्रतिभा राठोड,सतिष खोके,निलेश मोहुर्ले,ईत्यादींनी विशेष सहकार्य केले



सकाळी 11वाजता पंचायत समीतीच्या सभागहात सरपंच संघटनेच्या वतीने पत्रकार माणिक कांबळे यांच्या हस्ते केक कापुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी अखील भारतीय सरपंच संघटचे तालुका अध्यक्ष अविनाश लांबट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत कार्यक्रमाला संघटनेचे सचिव सुरेश लांडे,वनोजा उपसरपंच प्रशांत भंडारी,सराटी चे सरपंच तुळशीराम कुमरे, शिवणीचे सरपंच निलेश रासेकर, चिंचाळाचे उपसरपंच शशिकांत तावाडे, पत्रकार रोहन आदेवार, सामाजिक कार्यकर्ता पवन ढवस,प्रविण बोतले पत्रकार प्रतिभा तातेड आदि उपस्थित होते.

## नाटके सादर करण्यात सातत्य ठेवणारे उरण तालुक्यातील गाव, कुंडेगाव !

### रायगड भूषण प्रा एल बी पाटील



**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

मागील ३० / ४० वर्षांपूर्वी उरण तालुक्यातील काही गावांना दर वर्षी एक किंवा तीनचार नाटकेही सादर होत असत परंतु त्यानंतर या सादरीकरणात खंड पडत गेला, काही गावांना नाटकांचे सादरीकरण थांबले आहे. मात्र मागील सत्तर वर्षां पैकी ५/६ वर्षे सोडल्यास कुंडेगाव हे गाव सातत्याने नाटक सादर करणारे गाव आहे, असा विचार ज्येष्ठ साहित्यिक रायगड भूषण प्रा.एल बी पाटील यांनी माडला.नाटकाचे उद्घाटन सुनंदा लक्ष्मण पाटील यांच्या शुभहस्ते झाले.ग्रा.पं.सदस्या रंजना भोईर,कुंडेगाव अध्यक्ष अजय कुंडेगावकर, लोककलाकार दत्ता भोईर. प्रमोद ठाकूर, नाटककार किशोर पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, अनिल भोईर, प्रमोद पाटील, नितीन मढवी, नासिकेत म्हात्रे, कृष्णा गोवठणेकर,चंद्रविलास घरत इत्यादी तालुक्यातील प्रतिष्ठित आणि कलाकारांची आवर्जून उपस्थिती होती. या नाटकाचे लेखन भरत पाटील, दिग्दर्शन राजेंद्र चोगले, राजेश पाटील, रंगभूषा अमृत म्हात्रे, प्रकाश योजना, संगीत मोहन भोईर,दिलीप पाटील, ध्वनी धृव म्हात्रे इत्यादींनी आपली कामगिरी चोख बजावली. कलाकार भरत पाटील,राजेश पाटील, राजेंद्र चोगले,सुदर्शन भोईर,जयवंत पाटील,राजेंद्र पाटील,शौर्य पाटील,रुपये मढवी,अन्विता पाटील,प्रज्ञा म्हात्रे, वैशाली मोहिते या सर्वांनी कसलेल्या कलाकारांना साजेशी अभिनय सादर करून गाव कलाकारांचे सुंदर नाटक परिसरातील प्रेक्षकांना दिले.

## शिवप्रेमी सामाजिक संस्था लोणारेचा ; आठवा वर्धापनदिन मोठया जल्लोषात

### सेलिब्रिटी नाईट मध्ये नृत्यांगना गौतमी पाटीलचा नृत्य आविष्कार



**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

संस्थापक अध्यक्ष रोहित राजेंद्र पाटील यांच्या “शिवप्रेमी सामाजिक संस्थेचा” आठवा वर्धापन दिन रविवार दि.18 मे 2025 रोजी अलिबाग लोणारे येथे मोठया जल्लोषात साजरा झाला आठव्या वर्धापन,दिनानिमित्त,सादर करण्यात आलेल्या सेलिब्रिटी नाईट मध्ये महाराष्ट्राची सुपरहिट नृत्यांगना गौतमी पाटील हीने जबरदस्त नृत्य आविष्कार सादरकरून उपस्थित रसिक प्रेक्षकाना मंत्रमुग्ध केले. या सदाबहार कार्यक्रमा साठी प्रमुख उपस्थिती म्हणून चित्रलेखा ताई पाटील, सोनी टीव्ही भारताचा पहिला मराठी इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे, कलर्स मराठी गौरव महाराष्ट्राचा महागायक वैभव थोरवे, मिस समर तुलीप इंडिया तथा सिने अभिनेत्री दीपिका पाटील,आणि मान्यवराच्या समवेत या कार्यक्रमा साठी सुमारे दहा हजार लोकांपेक्षा अधिक लोक उपस्थितीत होते.या कार्यक्रमाचे खासआकर्षण होते लकीड्रॉ,यासाठी युवा सेना उपजिल्हाप्रमुख परेश दादा किल्लेकर यांच्याकडून, होंडा शाईन, बाईक देण्यात आली होती. शिवप्रेमी सामाजिक संस्था लोणारेच्या आठव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील14 विशेष प्राविण्यप्राप्त व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते शिवरत्न भूषण- 2025, पुरस्कार देऊन त्याना सन्मानित करण्यात आले

## गोरगरीबांचा आवाज बनून लढण्याची भाई जयंत पाटील यांची ग्वाही; शेकापच्या मेळाव्यात चित्रलेखा पाटील यांची ऊर्जा देखील लक्षणीय

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

"गोरगरीबांची ढाल बनून लढायचंय," असा निर्धार शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार भाई जयंत पाटील यांनी व्यक्त केला. पेझारी येथे आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. "लाल बावटा ही फक्त चळवळीची खूण नाही, तर गोरगरीबांच्या हक्कासाठी उभा राहण्याचा प्रतीक आहे," असे ते म्हणाले.रायगडसारख्या जिल्ह्यात नवनवीन विकास प्रकल्प होत असतानाही स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही, यासाठी शेकाप त्यांच्यासोबत खंबीरपणे उभा राहील, असा विश्वास त्यांनी दिला.भाई जयंत पाटील यांच्या भाषणात जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून पक्ष नव्या दमाने पुढे नेण्याचा विश्वास दिसून आला. "शेकापचा सुवर्ण इतिहास पुन्हा मिळवण्याची वेळ आली आहे. हे काम त्वेषाने, चिडीने आणि निष्ठेने करावे लागेल," असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या मेळाव्यात खास उपस्थिती लाभली ती शेकापच्या रायगड जिल्हाध्यक्ष चित्रलेखा पाटील यांची. त्यांच्या नेतृत्वात महिलांचा सहभाग लक्षणीय वाढत असून, ग्रामीण भागातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. चित्रलेखा पाटील यांनी महिलांना संघटित करण्याचे काम गेल्या काही महिन्यांत प्रभावीपणे हाताळले असून, त्या शेकापच्या नव्या ऊर्जा स्त्रोत म्हणून पुढे येत आहेत.कार्यकर्त्यांच्या उत्साहात आणि घोषणांमध्ये "शेकापचा विजय असो!" असा आवाज निनादत राहिला. लाल बावटा हाती घेतलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह, त्यांची निष्ठा आणि संघटनबळ यामुळे पक्षाला नवसंजीवनी मिळत असल्याचे चित्र या मेळाव्यात दिसून आले.या वेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, माजी आमदार बाळाराम पाटील, प्रा. एस.व्ही. जाधव, अड. राजेंद्र कोरडे, अड. मानसी म्हात्रे, प्रदीप नाईक, अतुल म्हात्रे, सुप्रिया पाटील, सुरेश खैरे, प्रशांत नाईक, अनिल पाटील आणि इतर अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## माहीममध्ये झाडांची छाटणी सावंत यांची तत्काळ कृती

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई,** १९ मे २०२५ – माहीम परिसरात अवकाळी पावसामुळे झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकल्या होत्या, ज्यामुळे रहदारीस अडथळा येत होता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. हे लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्त्या ऍड. योगिता सावंत यांनी तात्काळ बीएमसीशी संपर्क साधून झाडांची छाटणी सुरू केली. विशेष म्हणजे, या कामात त्यांनी स्वतः सक्रिय सहभाग घेतला आणि वर्कर्ससोबत झाडांच्या छाटणीचे निरीक्षण व मार्गदर्शन केले. स्थानिकांनी त्यांच्या या तत्परतेचं कौतुक करत, "आमच्या भागात अशी लोकप्रतिनिधी असणे ही आमची भाग्य आहे," असे म्हणत आभार मानले. "सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मी नेहमी त्यांच्या पाठीशी आहे," असे मत ऍड. सावंत यांनी व्यक्त केले.



## प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

गुप ग्रामपंचायत भाताण व भाताण पाडा गावात विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि शुभारंभ भाजपचे नेते, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. पाण्याची टाकी, स्वप्नील भोईर ते अनिल काठावले यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी. सी. गटार, सभामंडप, नथुराम भोईर ते रमेश घोगरे यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी.सी गटार या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी माजी. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासोबत बबन मुकादम (मा. नगरसेवक), श्री. तानाजी पाटील (सरपंच), श्री. चंद्रकांत भोईर ( मा.सरपंच), श्री. अविनाश गाताडे ( विभागीय अध्यक्ष), श्री. मंगेश वाकडीकर (तालुका अध्यक्ष), श्री. तानाजी खंडागळे, श्री. प्रविण ठाकूर, श्री. गणेश गाताडे (मा.उपसरपंच), कुं. रोहित घरत (मा. उपसरपंच), श्री. दिपक ठाकूर, श्री. अरुण पाटील, श्री. अनिल काठावले, श्री. किरण मुकादम, श्री. स्वप्निल भोईर, श्री. महेंद्र गोजे, श्री. रुपेश ठाकूर व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तामसाळा गावाची जलक्रांती."एक हजार एक जलताऱ्याची पूर्तता..

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



**वाशिम-20 मे. (जीमाका.)** वाशिम तालुक्यातील तामसाळा या छोट्याशा गावाने जलसवर्धनाच्या क्षेत्रात मोठी कामगिरी बजावली आहे. येथे तब्बल 1001. जलतारे यशस्वीरित्या पूर्ण करून त्याग करण्यात आलेले आहेत. हे यश सूक्ष्म नियोजन प्रभावी समन्वय आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सहभागाचा परिणाम असून जिल्ह्यातील इतर गावासाठी ते एक प्रेरणादायी मॉडेल ठरणार आहे. हे नक्की. तलाठी ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या प्रयत्नातून गावात समन्वय साधून हा उपक्रम राबविण्यात आला या अधिकाऱ्यांनी गावातील तरुणांना जलवीर म्हणून संघटित केले. त्यामुळे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना बळावली. ग्रामस्थांचा जलतारे खोदण्याचे केवळ यांत्रिक काम न ठेवता एनजीओ व उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर. वाशिम तहसीलदार निलेश पळसकर. तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे. यांच्या प्रमुख उपस्थितीत जलतारा उभारणीसाठी योजनाबद्ध प्रयत्न करण्यात आले. प्रारंभि गावकऱ्याकडून साहेब प्रेरित योगदान घेतले गेले. आणि त्यानंतर शासकीय योजनांचा लाभ घेऊन जलतारे पूर्ण करण्यात आले. या उपक्रमाच्या यशाबद्दल वाशिम जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांनी विशेष परिश्रम शुभेच्छा दिल्या.. जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या तामसाळा गावाने दाखवून दिले की योग्य नियोजन सहभाग आणि चिकाटी असेल तर कोणते उद्दिष्ट अशक्य राहत नाही. या टीमचा आम्हाला सार्थ अभिमान.

## रक्षकच झाले भक्षक...!!!
### ३ लाख रुपये दे नाहीतर
### तुला व तुझ्या परिवाराला 'पॉस्को' मध्ये अडकवू.

**दैनिक युवक आधार**
**विभागीय प्रतिनिधी**
**उमेश पाटील.**



चाळीसगाव शहरातील एका टायपिंग इन्स्टिट्यूट मालकाकडे ३ लाख रुपये द्या नाहीतर तुझ्यासह तुझ्या परिवाराला पॉस्को च्या गुन्ह्यात अडकवु अशी धमकी देत त्यांच्याकडुन १ लाख २० हजार रुपये खंडणी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन च्या काही कर्मचाऱ्यांनी घेतल्याची माहिती मिळाली. तात्काळ संबंधित तक्रारदार यांच्यासह आमदार मंगेश चव्हाण शहर पोलीस स्टेशन गाठून ४ तास ठिय्या दिला असता खंडणी उकळणारे संबंधित पोलीस कर्मचारी अजय पाटील व त्याचे इतर साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी सदर पोलीस कर्मचारी याच्या घरून त्याने खंडणी घेतलेले १ लाख २० हजार रुपये देखील त्याच्या घराच्या झडतीत हस्तगत करण्यात आले. ज्या पोलिसांनी नागरिकांना अपप्रवृत्ती पासून संरक्षण दिले पाहिजे तेच कायद्याचे रक्षक जर भक्षक होऊन सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरत खंडणी उकळत असतील तर ते कदापिही सहन केले जाणार नाही. या प्रकरणाच्या बाबतीत मी राज्याचे मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे तक्रार करणार असून यात सहभागी सर्व पोलिसांची IPS दर्जाच्या अधिकारी यांच्याकडून चौकशी करण्याची मागणी करणार आहे. मी माझ्या आमदारकीच्या पहिल्या दिवसांपासून अश्या प्रवृत्तीच्या विरोधात असून मग तो कितीही मोठा व्यक्ती असो किंवा जवळचा असो त्याला योग्य ते शासन व्हावे व पीडित नागरिकांना न्याय मिळावा असा माझा प्रयत्न आहे. माझी सर्व चाळीसगावकरांना विनंती आहे की, शासन प्रशासनातील कुणीही आपल्याला त्रास देत असेल, कुठेही पैश्यांची मागणी होत असेल, अडवणूक होत असेल, पोलिसांकडून न्याय मिळत नसेल तर आपण विनासंकोच माझ्याशी कधीही संपर्क साधा. असे आवाहन जनतेला करतो. मंगेश चव्हाण नागरिकांच्या पाठीशी कायम उभा राहील याची ग्वाही मी देतो.

**- आमदार मंगेश रमेश चव्हाण (चाळीसगाव)**

# माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते माणुसकी सोशल फाउंडेशनच्या समाजभूषण पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**




**निफाड,दि.१७ मे:-** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी बहुजन समाजाला मुख्यप्रवाहात आणण्यासाठी महत्वपूर्ण काम केले. अन्याय अत्याचाराच्या विरोधात त्यांनी लढा दिला. त्यांचा आदर्श सर्वांनी पुढे घेऊन जाण्याची गरज आहे, असे सांगत माणुसकी फाउंडेशनचे सामाजिक बांधिलकीचे व्रत अतिशय महत्वपूर्ण आहे असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले. लक्ष्मी पतसंस्था सभागृह, उगाव रोड निफाड येथे माणुसकी सोशल फाउंडेशन आयोजित श्री.छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने समाजभूषण पुरस्काराचे वितरण राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.माणुसकी सोशल फाउंडेशनचे सागर निकाळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते यावेळी शिवाजीराव ढेपले,तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर,अनिल पाटील कुंदे, श्री संत निवृत्तीनाथ महाराज देवस्थान अध्यक्ष अड सोमनाथ घोटेकर,अड.शेखर देसाई, प्रा.शरद शेजवळ, डॉ.श्रीकांत आवारे, डॉ.सुजित गुंजाळ, शिवाजी ढेपले, मधुकर शेलार, राहुल सोनवणे, कवी राजेंद्र सोमवंशी, किशोर वडजे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्तीचे अभिनंदन करत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, हा फक्त एक पुरस्कार समारंभ नाही, तर हे एक साक्षात प्रेरणादायी क्षण आहेत ज्यामध्ये मानवी सेवेला, निःस्वार्थ कार्याला आणि समाजाच्या उन्नतीसाठी वाहिलेल्या जीवांना सन्मान आहे.आजचा दिवस हा त्या सर्वांचा सन्मान करण्याचा दिवस आहे, ज्यांनी स्वतःच्या गरजांपेक्षा इतरांच्या गरजा महत्त्वाच्या मानल्या. ज्या व्यक्तींनी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी आपलं आयुष्य अर्पण केलं, अशा व्यक्तींना 'समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, आपण ज्या संस्थेच्या वतीने हा सोहळा साजरा करत आहोत, ती संस्था गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाज परिवर्तनाचा वसा घेऊन कार्यरत आहे. माणुसकी सोशल फाउंडेशन वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात.त्यांच्या या कामामध्ये सातत्य आहे.सामाजिक बांधिलकीचे त्यांचे हे व्रत अतिशय महत्वपूर्ण आहे. माणुसकी फांऊडेशनच्या वतीने आजवर पत्रकार दिन गुणगौरव सोहळा, गोर गरीब नागरिक, मंजूर उसतोड कामगार यांना कपड्यांचे वाटप,निराधार महिलांना साडीचोळी वाटप,थंडीचे दिवसात रेल्वेस्टेशनवर निराधार नागरिकांना ब्लँकेट वाटप ,सफाई कामगार महीलांचा सन्मान करण्यात येत आहे. जन्माला आलेल्या मुलींना मोफत कपडे व आईला साडी वाटप,तृतीयपंथीचा साडीचोळी देऊन सन्मान ,शहीद कुटुंबातील लोकांचा सन्मान असे विविध सामाजिक उपक्रम माणुसकी फांऊडेशन च्या माध्यमातून राबवले जातात. या पुरस्कारप्राप्त व्यक्ती केवळ नावासाठी कार्य करत नाहीत. त्यांचं कार्य हा त्यांचा श्वास आहे. समाजातील वंचित,दुर्लक्षित, उपेक्षित घटकांसाठी ते आशेचा किरण बनले असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपलं संपूर्ण आयुष्य वेचले. समाजासाठी काम करत असतांना त्यांनी समाजाचे अनेक प्रहार देखील सोसले. मात्र त्यांनी आपलं काम सुरू ठेवले. महात्मा जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून काढली. त्यांच्या पहिला पोवाडा देखील लिहिला. असे त्यांनी सांगितले. ` म्हणाले की, मी या संस्थेचं मनापासून कौतुक करतो की त्यांनी हे कार्य ओळखून योग्य वेळी योग्य लोकांना सन्मानित केलं आहे. अशी सन्मान परंपरा ही समाजाच्या मनोबलासाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण जेव्हा समाज कार्य करणाऱ्यांना मान मिळतो, तेव्हा त्यांच्यासोबत अनेक नवीन हात देखील उभे राहतात. "जे झाड सावली देतं, त्याच्या मुळांमध्ये कोणीच पाहत नाही. पण त्या मुळांच्या मेहनतीमुळेच फळं आणि फुलं येतात. आज आपण अशा मुळांचा सन्मान करत आहोत, ज्यांनी कोणताही गाजावाजा न करता समाजाला सावली आणि आशा दिली आहे." आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण एक सशक्त, समान, आणि संवेदनशील समाज उभारू शकतो असे त्यांनी सांगितले.

## जलतारा स्पर्धेला ३० मे २०२५.पर्यंत मुदतवाढ.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**




वाशिम जिल्ह्यात भूगर्भातील पाणी पातळी वाढवण्यासाठी जलसंधारण उपायोजनाचा एक भाग म्हणून जलतारा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी श्रीमती भुवनेश्वरी एस. यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या जलतारा स्पर्धेला नागरिकाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून आत्तापर्यंत 586. गावांनी सहभाग नोंदविला आहे. यापूर्वी स्पर्धेची अंतिम मुदत. 20 मे 2025. निश्चित करण्यात आली होती. तथापि अनेक गावांनी सहभागी होण्यासाठी अतिरिक्त कालावधीची मागणी केल्याने जिल्हाधिकारी भुवनेश्वरी यश. यांच्या आदेशान्वये वत्सगुल्म जलतारा स्पर्धेची अंतिम मुदत. 30 मे 2025.पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. मुदतवाढीचा मुख्य हेतू अद्याप सहभागी न झालेल्या तसेच जलसंधारणाच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेल्या पाणीटंचाईग्रस्त गावांना स्पर्धेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे सर्व गावांनी विशेषतः जिथे पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर आहे अशा गावांनी जलतारा उभारणीसाठी तातडीने पुढाकार घेऊन स्पर्धेत सहभाग नोंदवावा. असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जलतारा उपक्रमाद्वारे भूगर्भातील पाणी साठवून क्षमता वाढवली जाते. पावसाचे पाणी शोषून घेण्यासाठी तयार केलेले हे शोषखड्डे जमिनीत नैसर्गिक जलसाठा निर्माण करतात. त्यामुळे विहिरी हापसी बंधारे आधी जल स्त्रोतामध्ये पाणी पातळी वाढून उन्हाळ्यातील टंचाईवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. प्रशासनाने सर्व ग्रामपंचायती ग्रामविकास अधिकारी व स्थानिक नेतृत्व यांना निर्देश दिले आहेत की त्यांनी एकरी एक जलतारा उभारण्याच्या ध्येयाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा. असे आवाहन मालेगाव तालुका कृषी अधिकारी. कैलास देवकर यांनी केले आहे.

## पुरवठा अधिकाऱ्यांना पाठवले सक्तीच्या रजेवर

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांना 19 मे पासून सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. कर्तव्यात कसूर आणि कामांमध्ये अनियमतेबाबत यापूर्वी तीन जानेवारी रोजी देखील अश्विनी धनवे यांना तहसीलदार विजय पाटील यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्या पथकाने 16 मे रोजी अवैधरित्या जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करताना गाडी पकडली. या गाडीमध्ये तांदूळ आढळला असून संबंधितांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत कारवाई करणे आवश्यक होते. मात्र 18 मे पर्यंत कोणतेही कारवाई केलेली दिसून आली नाही. पनवेल शहर पोलीस ठाण्यात यापूर्वी सात मे रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मात्र या गुन्ह्यातील जप्त तांदळाचे नमुने प्रयोग शाळेमध्ये तपासणीसाठी पाठवलेले नाहीत. या प्रकरणांमध्ये नियमानुसार कारवाई करणे अपेक्षित असताना कोणतीही कारवाई केलेली तहसील विभागाला दिसून आलेली नाही. त्यामुळे नेमून दिलेल्या कामात हेतूपुरस्कर दुर्लक्ष करून अक्षम्य हलगर्जीपणा करून शासकीय कामकाज बाधित झाल्याचे निदर्शनास आले. शासकीय कामांमध्ये हेतू पुरस्कर दुर्लक्ष करत असल्यामुळे 19 मे पासून पुरवठा निरीक्षण अधिकारी अश्विनी धनवे यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.

पनवेल येथील पुरवठा अधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. तालुक्यात अनेकांना रेशनिंग धान्य वेळेवर मिळत नाही तर अनेकांची नावे ऑनलाइन झाली नसल्याने त्यांचे नुकसान होत आहे. जाहीरनामे निघालेले नसल्याने कित्येक लाभार्थ्यांना अन्य गावात जावे लागत आहे. बरीचशी रेशनिंग दुकाने मोजक्याच दिवसांसाठी सुरू असतात तसेच नवीन रेशन कार्ड मिळवण्यासाठी चार ते पाच महिने फेऱ्या माराव्या लागतात. रेशनिंग दुकानदारांचा मनमानी कारभार सुरू असताना त्यांच्यावर पुरवठा विभागाकडून कारवाई होत नाही.

# जवळगावकर परिवाराची लाडकी लेक झाली कवळे घराण्याची सून हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत शाही विवाह संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

मराठवाडा विभागात लक्षवेधक ठरलेला नांदेड शहरात आजपर्यंतच्या कार्यकाळातील सर्वात मोठी लोकसंख्या उपस्थितीत असलेला शाही विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय नांदेड येथे संपन्न झाला हा विवाह माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांची सुकन्या चिसौका नेहा व उद्योजक तथा व्हीपीके उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांचे सुपुत्र संदीप यांचा ऋणानुबंध जुळवून मोठ्या संख्येच्या उपस्थितीत शाही विवाह सोहळा नांदेड येथे संपन्न झाला या विवाह सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा.ना मकरंद आबा पाटील जाधव, माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार नांदेड जिल्ह्याचे लोकनेते मा ना अशोकरावजी चव्हाण साहेब, माजी महसूल मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मा.बाळासाहेबजी थोरात, हुजूर साहिब गुरुद्वारा चे बाबा बलविंदरजी सिंघ,माजी मंत्री माधवरावजी किन्हाळकर, माजी मंत्री सूर्यकांताताई पाटील,हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, राज्यसभा खासदार अजितजी गोपछडे,नांदेड लोकसभा खासदार रवींद्र पाटील चव्हाण,माजी खासदार सुभाषजी वानखेडे, मा.आ. प्रतापरावजी पाटील चिखलीकर,भाजप मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कौडगे,आमदार नारायण पाटील,आमदार बाबुरावजी कोहळीकर,आमदार आनंदरावजी बोंढारकर, आमदार भीमरावजी केराम, आमदार तुषारजी राठोड,माजी मंत्री डी.पी सावंत, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार ओमप्रकाशजी पोकर्णा,खासदार प्रतिनिधी सौ राजश्रीताई हेमंत पाटील,आमदार प्रतिनिधी संध्याताई बालाजी कल्याणकर,आमदार प्रतिनिधी सौ वर्षाताई राजूभैया नवघरे, भाजपचे महानगराध्यक्ष अमर भाऊ राजुरकर, माजी आमदार गंगाधररावजी पटणे,माजी, माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे,आमदार हनुमंतरावजी बेटमोगरेकर, श्रीमती सुमनताई लक्ष्मणराव जाधव, मा. मिलिंद काका जाधव पाटील, मा. क्षितिज नितीन काका जाधव, पाटील,शौर्य नितीनकाका जाधव पाटील, आदवेद मिलिंदराव जाधव पाटील,सौ. प्रतिमा नितीनकाका जाधव पाटील,सौ.अर्चनाताई मकरंद आबा पाटील मिलिंदराव जाधव, मस्करभाऊ सातारकर,पाटील कवळे परिवाराचे स्नेही जावई उत्कर्ष जाधव पाटील, प्रवीण पाटील कदम लगळूदकर, प्रशांत पाटील ढोणे,राजेश पाटील कदम शेलगावकर,स्वछता दूत माधवरावजी पाटील शेळगावकर,मा संतुकरावजी हंबर्डे, चैतन्य बापू देशमुख, प्रवीण साले,विजयजी धोंडगे,पुरषोत्तम धोंडगे,अशोक पाटील मुगावकर,माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर,उपमाहापौर आनंद चव्हाण,उमरी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिरीष देशमुख गोरठेकर,बालाजीराव बच्चेवार, श्रावण पाटील भिलवंडे,माजी शिक्षण सभापती संजयजी बेळगे, संजय देशमुख लहानकर, गोविंदरावजी नागेलीकर, किशोर स्वामी, बाळासाहेब रावणगावकर, जगदीश पाटील भोसीकर, रामचंद्रजी मुसळे, किशोर पाटील लघुळकर, शंकर पाटील लगळूदकर, माजी सभापती पूर्णा प्रकाश पाटील ढोणे, गणेशराव पाटील कारखेलीकर, दत्ताहरी पाटील चोळाखेकर, विश्वनाथ पाटील बनाळीकर,रवींद्र पोटगंतीवर, पिराजी पाटील पाटोदेकर, बालाजीराव पंडागळे,बाळू खोमणे, बाळासाहेब देशमुख बारडकर, शिवश्री कामाजीराव पवार साहेब भाऊराव कारखान्याचे माजी चेअरमन गणपतरावजी तिडके साहेब, चेअरमन नरेंद्रदादा चव्हाण,रूपामाता धाराशिव चे अनितजी गुंड,कुंटूरकर शुगर चेअरमन राजेश देशमुख कुंटूरकर,सुभाष शुगर चेअरमन सुशीलजी देशमुख, वैभव इंडस्ट्रीस लातूर चे सर्वेसर्वा शिवलिंगजी बर्गे, कॉन्ट्रॅक्टर शरदजी दाताळ,ऍड भाऊसाहेब गोरठेकर, पांडुरंग देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष सुभाषजी पेरेवार,उमरीचे तहसीलदार थोरात साहेब, साखर प्रतिष्ठित व्यापारी निझारसेट लालानी,इस्तक भाई, असलम सेट,रमेश शेठ बजाज, फैसल भाई,मनोजजी लड्डा, योगेशजी उपलनचवार, सुमित खंडेलवाल अकोला, साकेतजी एमपी, विशालजी दरडा, बळरामजी बिडवई कंधार,आनंदजी बिडवई कंधार, वाघलवाडा साखर कारख्याण्याचे सन्माननीय संचालक व जी एम एस. जी आंबटवाड, व्हीपीके पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ , सचिव नागनाथजी पांचाळ,जी एम नामदेवराव इंगोले,गुरुजी फाउंडेशन चे सर्व संचालक,उमरी शहरातील सर्व प्रतिष्टीत व्यापारी, समस्त सिंधी गावकरी,यांच्यासह नांदेड जिल्हा भरातील आजी माजी आमदार, सर्व पदाधिकारी,जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य,नगराध्यक्ष,नगरसेवक जिल्ह्यातील, शासकीय अधिकारी कर्मचारी, व्यापारी,सरपंच उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते शेतकरी बांधव, सर्व दूध उत्पादक, ऊस उत्पादक, पतसंस्थेचे सर्व ठेवीदार सभासद,माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# दैनिक 'युवक आधार' च्या पत्रकारांसाठी मार्गदर्शनपर SOP

**प्रिय पत्रकार बंधू-भगिनींनो,**

दैनिक युवक आधार या सामाजिक जाणीवेच्या दैनिकासाठी तुम्ही करत असलेले प्रामाणिक, तळमळीचे आणि जमीनीवरचे कार्य हेच या दैनिकाचे खरे बळ आहे. आपल्या परिसरातील सत्य घटना, स्थानिक समस्या आणि जनतेच्या भावनांना योग्य शब्दांत मांडत आपण लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे कर्तव्य पार पाडत आहात. आता या कार्याला अधिक प्रभावी बनवण्यासाठी बातमी संकलन, अभ्यासपूर्ण लेखन, जाहिरात संकलन आणि WhatsApp ग्रुपद्वारे अंकाचा प्रसार या चारही बाबींमध्ये संघटित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पुढे जाणे गरजेचे आहे. प्रत्येक तालुक्यातून एक सशक्त, विचारमूल्य आणि जनतेशी जोडलेला पत्रकार म्हणून आपली ओळख निर्माण करावी आणि दैनिक युवक आधार हे केवळ एक वर्तमानपत्र नसून, बदल घडवणारे आंदोलन आहे, हे सिद्ध करावे.

**आसाराम विरकर**

दैनिक 'युवक आधार' च्या पत्रकारांसाठी मार्गदर्शनपर SOP

1. बातमी संकलन (News Collection)

उद्दिष्टः आपल्या परिसरातील महत्त्वाच्या घडामोडींचे अचूक, सत्य व तटस्थ वार्तांकन करणे.

**पद्धतः**

स्थानिक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, पोलीस, राजकारण, सामाजिक घटना यावर लक्ष ठेवून रोजची निरीक्षणे नोंदवा.

कोणतीही बातमी छापण्यापूर्वी किमान दोन स्वतंत्र स्रोतांकडून तिची खातरजमा करावी.

संबंधित व्यक्तींचे प्रतिक्रिया (quotes) अवश्य घ्या.

बातमी सोबत स्पष्ट फोटो/व्हिडिओ जोडावेत.

लेखनात "काय, कुठे, केव्हा, कसे, कोण, का" याची उत्तरे अंतर्भूत असावीत.

2. विषयानुसार लेखन (Local Issue-Based Article Writing)

उद्दिष्टः स्थानिक जनतेच्या समस्या, समाधानाच्या उपाययोजना व सामाजिक जाणीव निर्माण करणारे अभ्यासपूर्ण लेख तयार करणे.

**पद्धतः**

पाणीटंचाई, आरोग्य, शिक्षण, महिला-सुरक्षा, बेरोजगारी अशा विषयांची निवड करावी.

लेख तीन भागांत मांडावाः समस्या – सध्याची स्थिती – उपाययोजना.

लेखात आकडेवारी, उदाहरणं व प्रत्यक्ष अनुभवांचा समावेश असावा.

लेखाचा शेवट सकारात्मक संदेश व जनजागृतीने करावा.

3. जाहिरात संकलन (Advertisement Collection)

उद्दिष्टः स्थानिक व्यावसायिकांसाठी प्रसिद्धीचं व्यासपीठ आणि दैनिकासाठी उत्पन्नाचे स्त्रोत तयार करणे.

**पद्धतः**

स्थानिक दुकानदार, व्यावसायिक, क्लासेस, राजकीय इच्छुक, शासकीय योजनांचे लाभार्थी यांच्याशी संपर्क करा.

दैनिकाचे वाचकवर्ग, विश्वासार्हता आणि समाजमाध्यमावरचा प्रभाव यावर आधारित जाहिरात प्रस्ताव तयार ठेवा.

आकर्षक जाहिरात दरपत्रक सादर करा.

जाहिरात वेळेवर प्रसिद्ध करणे, स्पष्टता राखणे आणि प्रतिसाद कळवणे या सेवा प्रामाणिकपणे द्या.

4. WhatsApp ग्रुपद्वारे वाचनवर्ग वाढवणे

उद्दिष्टः प्रत्येक तालुक्यातील नागरिकांपर्यंत दैनिकाचा अंक पोहोचवणे व त्यांच्या सहभागातून वाचनवर्ग मजबूत करणे.

**पद्धतः**

1. ग्रुप तयार करतानाः

नाव ठेवावेः "दैनिक युवक आधार - [तालुका नाव]"

(उदा. दैनिक युवक आधार - पाथरी)

केवळ 2 ग्रुप ॲडमिन असावेत. त्यांना "ग्रुप ॲडमिन" म्हणून ओळख पटवावी.

वरिष्ठ संपादकीय मंडळींना ग्रुपमध्ये जरूर समाविष्ट करावे.

**2. सदस्य निवडः**

पत्रकार, शिक्षक, डॉक्टर, सेवाभावी संस्था पदाधिकारी, सुशिक्षित नागरिक, वाचक.

स्थानिक समाजात प्रभाव असलेले जागरूक लोक.

**3. गट वापरण्याची शिस्तः**

दररोज सकाळीच दैनिकाचा E-paper किंवा बातम्या एकदाच पोस्ट कराव्यात.

विनाकारण फॉरवर्ड, राजकीय/धार्मिक मेसेज टाळावेत.

फक्त माहितीपर, दैनिकाशी संबंधित पोस्ट्स ठेवाव्यात.

**4. उपलब्ध परिणामः**

दैनिकाचा प्रसार वाढेल.

वाचकांमध्ये विश्वास निर्माण होईल.

जाहिरातदारांचा प्रतिसाद वाढेल.

महत्त्वाच्या सूचनाः

कोणतीही बनावट, जातीय/धर्माधारित, द्वेष पसरवणारी किंवा मानहानीकारक माहिती टाळा.

कायदेशीर व सामाजिक जबाबदारी पाळा.

आपल्या बातमी/लेखामुळे स्थानिक समाजात सकारात्मक बदल व्हावा, ही भावना ठेवा.

**आपला सहकारी**
**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार ,मराठवाडा आवृत्ती**

# आरोग्य संजीवनी

संकलन, उमेश पाटील

शेवगा

शेवगा ही एक शेंग भाजी आहे. दक्षिण भारतात आढळणारी ही वनस्पती खूप औषधी देखील आहे. या शेवग्याचे फायदे आणि गुणधर्म आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

*शास्त्रीय नावः* मॉरिंगा ओलेफेरा

हवामान*– या झाडासाठी समशीतोष्ण आणि दमट वातावरण आवश्यक असते.

उंची* – साधारण उंची १० मी. असते

**प्रमुख उपयोग –**

शेवग्याच्या शेंगा कालवण, कढी, आमटी किंवा सुकी भाजीत शिजवून खाल्ल्या जातात. या झाडाची पाने, फुले, फळं, साल, आणि मुळे या सर्वांचा उपयोग आयुर्वेदिक औषधे आणि नैसर्गिक उपचारात केला जातो. बियांपासून तेल सुद्धा काढले जाते आणि पानांपासून आपण भाजी बनवू शकतो. शेवगा हा हाडांसाठी वरदान आहे. यामध्ये कॅल्शिअम आणि प्रथिने जास्त प्रमाणात आढळतात.तसेच कार्बोहायड्रेट, पोटॅशिअम, आयर्न, मॅग्नेशिअम, व्हिटॅमिन ए, सी आणि बी अशी भरपूर जीवनसत्त्वे शेवग्यामध्ये आढळतात. कोवळ्या पानांची भाजी महाराष्ट्रात मृग नक्षत्रात केली जाते. पावसाळ्याच्या सुरुवातीला शरीरातील वातदोष वाढलेला असतो म्हणून ही भाजी तेव्हा आवर्जून खाल्ली जाते.

**शेवग्याचे आयुर्वेदिक गुणधर्म –**

१. हाडे मजबूत आणि निरोगी राहण्याकरिता शेवग्याची भाजी नियमित सेवन करावी.

२. वजन जास्त वाढले असल्यास शेवग्याच्या शेंगेचे सूप बनवून प्यावे. नियमित पिल्यास चरबीचे प्रमाण कमी झालेले दिसेल. याबरोबरच नियमित व्यायाम देखील करावा.

३. शारीरिक दौर्बल्य असल्यास शेवग्याच्या शेंगा नियमित आहारात घ्याव्यात.

४. तसेच संधिवात, नेत्ररोग, स्नायूंची कमजोरी या व्याधी देखील बऱ्या होतात.

५. शेवगा हा उष्ण आहे म्हणून त्याचा वात आणि कफ या प्रकारच्या विकारांवर उत्तम उपयोग होतो.

६. शेवगा हा उत्तम पाचक आहे. पोटातील पचनक्रिया व्यवस्थित होऊन रक्तप्रवाह सुधारतो.

७. शरीरावर किंवा शरीराच्या आतील भागात आलेली सूज शेवग्याच्या सालीच्या काढ्याने कमी होते.

८. डोकेदुखी व जडपणा यावर शेवगा अत्यंत गुणकारी आहे.

९. शेवगा जंतनाशक असल्याने पोटातील कृमी विष्ठेवाटे बाहेर पडतात.

१०. रक्तदोष, मुतखडा, उच्च रक्तदाब, मधुमेह या आजारांमध्ये शेवगा गुणकारी आहे.

**सौंदर्य खुलवण्यासाठी उपयोग –**

अनेक जीवनसत्त्वांची कमतरता शेवगा भरून काढतो. जसे अन्न तसे मन आणि शरीर, या उक्तीप्रमाणे तुम्ही शेवगा नियमित सेवन करत असाल तर तुमचे सौंदर्य खुलवण्यात नक्कीच सहयोग होईल. त्वचाविकार, थकवा, आणि डोळ्यांचे विकार यामध्ये शेवगा नियमित सेवन करा. नक्कीच लाभ होईल व शारीरिक कांती उजळेल.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## विचित्र अपघातात तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
अनोळखी वाहन, कंटेनर आणि बुलेट यांच्यात झालेल्या विचित्र अपघातात. २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ओमकार श्रीकांत शिंत्रे असे या तरुणाचे नाव असून तो कोपरखैरणे, सेक्टर ५ येथे राहण्यास होता. उत्कर्ष पांडे हा ठाणे, वेस्ट येथे राहत असून तो त्याचा मित्र ओमकार शिंत्रे याला सोबत घेऊन त्याच्या बुलेटने इतर मित्रांबरोबर लोणावळा येथे फिरायला गेले होते. लोणावळा येथे फिरून दुपारच्या सुमारास ते घरी यायला निघाले. यावेळी ओमकार शिंत्रे हा उत्कर्ष याच्या मागे बसला होता व इतर मित्र कार मध्ये बसले. पळस्पे ते जेएनपीटी महामार्गाने ते घरी येत असताना उत्कर्षच्या बुलेट पुढे असलेल्या कंटेनर चालकाने अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे उत्कर्षने दुचाकीचा ब्रेक दाबला. त्यामुळे उत्कर्षचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ओमकार व उत्कर्ष दोघे रस्त्यावर खाली पडले. दरम्यान, पाठीमागून येणारे अज्ञात वाहनाचे चाक ओमकारच्या तोंडावरून गेल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## सिमेंट मिक्सरची स्कूटरला धडकः इसमाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
: सिमेंट मिक्सरने स्कूटरला दिलेल्या धडकेत संगीता धनाजी कडू या महिलेचा मृत्यू झाला. तिचे पती धनाजी कडू हे जखमी झाल्याची घटना कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या अपघाताप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात सिमेंट मिक्सर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सुकापूर येथे राहणारे धनाजी हे त्यांची पत्नी संगीता हिच्यासोबत त्यांच्या टीव्हीएस स्कूटरने नातेवाईकाच्या साखरपुड्याला छाया रिसॉर्ट, मानघर येथे गेले होते. मानघर येथून रात्रीच्या वेळेस घरी परत येत असताना उरण रोडवर सिमेंट मिक्सर चालकाने कडू यांच्या स्कूटरला धडक दिल्याने हा अपघात झाला.

## फसवणूक केल्या प्रकरणी ७ जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(वार्ताहर)**
शेअर्समध्ये गुंतवलेले पैसे आणि त्या पैशांवर मिळणाऱ्या कमिशनची रक्कम न देता फसवणूक केल्याप्रकरणी सात अनोळखी इसमांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील डांगे हे सेवानिवृत्त असून ते तळोजा फेज वन येथे राहतात. मार्च महिन्यात त्यांना विनिता पटोडिया या अनोळखी महिलेचा मेसेज आला आणि शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवल्यास भरपूर फायदा होईल, असे सांगण्यात आले. त्यानंतर या महिलेने तिच्या सहा साथीदारांच्या मदतीने सुनील डांगे यांना ग्रुपमध्ये जॉईन करून घेतले. इतर लोकांनी पैसे गुंतवल्यावर त्यांना कसा फायदा होतो, हे त्यांना समजावण्यात आले. त्यानंतर डांगे यांनी कमी किमतीचे शेअर्स विकत घेतले. यावेळी त्यांना फायदा झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर ते गुंतवत असलेल्या पैशावर जास्त फायदा होत असल्याचे त्यांना दाखवण्यात आले. त्यामुळे त्यांनी या टोळीने सांगितलेल्या विविध खात्यांवर पैसे पाठवून आणखी काही शेअर्स घेतले. अशा प्रकारे त्यांनी एकूण १० लाख ९१ हजार रुपयांची गुंतवणूक या शेअर्समध्ये केली. त्यानंतर त्यांनी गुंतवलेली रक्कम कमिशनसह देण्याबाबत विचारणा केली असता या टोळीने त्यांना आणखी पैसे गुंतवण्यास सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यावर या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी या प्रकरणात सात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सुझुकी मोटर कंपनीच्या लकी ड्रॉ मध्ये जिंकली चार चाकी कार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने संपूर्ण भारतभर लकी ड्रॉ योजना राबवण्यात आली. या लकी ड्रॉ मध्ये पनवेलच्या कनक सुझुकी शोरूम मधून दुचाकी घेतलेले दत्ताराम मारुती भगत यांनी चार चाकी कार जिंकली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. संपूर्ण भारतभरातून एकमेव कार विजेते दत्ताराम भगत




ठरले. सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने एक सप्टेंबर 2024 ते 30 नोव्हेंबर 2024 पर्यंत गाडी घेणाऱ्या ग्राहकांसाठी लकी ड्रॉ स्कीम राबवण्यात आली. रोहा येथील दत्ताराम भगत यांनी सप्टेंबर महिन्यात बर्गमॅन ही दुचाकी पनवेल येथील कनक शोरूम मधून विकत घेतली. त्यामुळे ते या लकी ड्रॉ स्कीम मध्ये सहभागी झाले. लकी ड्रॉ चा निकाल नुकताच लागला. यावेळी प्रथम मेगा पारितोषिक मारुती सुझुकी फ्रॉन्स ही चार चाकी कार दत्ताराम भगत यांना लागली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. यावेळी कनक शोरूमचे डायरेक्टर जितेश मारू, सुझुकीचे एरिया मॅनेजर रणवीर सिंह यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. यावेळी लकी ड्रॉ मध्ये कार जिंकलेले दत्ताराम भगत यांनी सर्वांचे आभार मानत कार मिळाल्याने आनंद झाला असल्याचे सांगितले आणि नागरिकांनी सुझुकी कंपनीच्या गाडी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

# जागतिक जैवविविधता दिन- देशभर चर्चेत आलेल्या मिशन "सिंदूर" या दुर्मिळ वृक्षाचे केळगावच्या शहीद स्मारकाजवळ रोपण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड -** भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरची भारदस्त कामगिरी केल्याने सिंदूर हा शब्द देशभर चर्चेला आला. हिंदू महिला सौभाग्य प्रतीक म्हणून सिंदूर कपाळी लावतात.खरा सिंदूर हा सिंदूर/ कुंकुम वृक्षाच्या फळांच्या टरफल व खोडापासून निर्माण केला जायचा व राजांचे व ऋषीं- मुनी यांचे भगवे रेशमी कापडं बनवण्यासाठी या झाडापासून निर्मित केशरी नैसर्गिक डायचा वापर होत असे. मात्र ही झाडे हळूहळू कमी होत गेली व त्या ऐवजी रासायनिक सिंदूर प्रचलनात आला.याच सिंदूर ची 40 हुन अधिक वयाची 3 च झाडे तालुक्यात बहुली ते चिंचपूर शिवारात खेळणा नदी काठी आहेत. या झाडांच्या मूळ्या नदीच्या पुरामुळे उघडया पडल्या होत्या,









त्यास आता डॉ. संतोष पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने मातीचा मोठा भर घालून सुरक्षित करण्यात आले आहे. याची गावच्या लोक जैवविविधता नोंद वहीत नोंद झाली आहे.या वृक्षाच्या बिजापासून सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांनी ही रोपं बनवली असून ती शहीद सैनिक व पहलगाम येथे मृत पावलेल्या देश बांधवांच्या स्मृती खातर केळगाव येथील शहीद संदीप जाधव यांच्या स्मारका जवळ विरमाता विमल जाधव, डॉ. पाटील, गणेश चाथे व जाधव सेवानिवृत्त सैनिकांच्या हस्ते रोपण करण्यात आले.

**सिंदूर / कुंकुम -जैवविविधते साठी महत्वाचा वृक्ष**

या वृक्षाच्या फळांच्या शेंदुरी रंगाच्या टरफला वर असलेल्या तंतुना खाऊन ( फायबर )" मॅन फेस बग" हा मानवी चेहऱ्या सारखा दिसणारा कीटक उपजीविका करतो.उन्हाळ्यात पक्व होणारी ही फळं खाण्यासाठी हा सुंदर कीटक या झाडावर अधिवास करतो. माकडेही हे बीज आवडीने खातात. अनेक जातीच्या मुंग्याही या फळाची बीज कुरतडून खातात.
'मॅन फेस बग' या कीटकास मानसासारखे दोन्ही बाजूस दोन डोळे, मध्ये नाक व ओठ, डोके असा त्याचा आकार असून कापसा सारखे तंतुमय घटक खाण्यास तो प्राधान्य देतो

*हे वृक्षारोपण भारत मातेस समर्पित*
भारत मातेच्या ललाटी हे वृक्ष सौभाग्य कायमच असावे, जैवविविधता जोपासली जावी म्हणून ही दुर्मिळ होत असलेली सिंदूर ज्याचे शास्त्रीय नाव "मेलोटस फिलीपेन्सिस" ( MELLOTUS PHILIPIENSIS ) असे आहे, ती झाडे आम्ही जतन केली आहेत व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षा निमित्ताने10 ठिकाणी नव्याने रोपणही करत आहोत.-

**- डॉ. संतोष पाटील,**
**जैवविविधता संवर्धक**

## तळागाळातील मुलांनी धेतला ऑरायन मॉल मधे "ऐक अद्भुत प्रयोगशाळा"सायन्स प्रदर्शनचा आनंद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
: कुडाळदेशकर आद्यगौडब्राम्हण पनवेल व ओरायन मॉल पनवेल यांच्या संयुक्तविद्यमाने सामाजिक ऊपक्रमा अंतर्गत, नेहरु सायंन्स सेंटर, मुंबई यांच्या सहयोगाने 'ऐओरायन मॉल पनवेल येथे विद्यार्थी साठी "ऐक अद्भुत प्रयोगशाळा"हे सायंन्स प्रदर्शन आयोजित केली आहे. हे प्रदर्शन व त्यातील मुलांसाठी चे वर्कशॉप याचे शुल्क रुपए ३०० येवढे आहे. परंतु तळागाळातील शाळेतील विद्यार्थीना ही प्रदर्शन बधता यावी या साठी कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण संस्था पनवेल व ओरायन मॉल यांच्या सामाजिक ऊपक्रमा अंतर्गत, बालग्राम अनाथ आश्रम पनवेल आणि जिल्हा परीषद शाळा , कराळे वाडी , जिल्हा कर्जत येथील विद्यार्थी साठी हे प्रदर्शनी विनामुल्य दाखवायचे ठरवले होते. या सायंन्स प्रदर्शना चा मनमुराद आनंद मुला मुलीनी घेतला. नेहरू सायन्स सेंटर येथुन आलेल्या स्वयंसेवकांनी प्रदर्शनातील प्रत्येक प्रयोग व त्या मागचे सायंन्स मुलांना समजऊन सांगीतले. वस्तुच्या चढ उतारा चे प्रयोग, बिंदु डोळ्या समोरुन नाहीसा होणे, दृष्टि भ्रम अशा अनेक प्रयोगाचे प्रत्यक्षीक दाखऊन नंतर सर्व मुलांना सगळे प्रयोग स्वतः अनुभवण्यास सांगीतले. नंतर सर्व मुलांचे सायंन्स वर्कशॉप घेतले . प्रत्तेकाला काही वस्तू



देऊन प्रयोग करायला सांगीतले व पुस्तकातले सायंन्स कसे प्रयोगातून अनुभवायला मिळते याची माहिती दिली. या नंतर सर्व विद्यार्थीना ऑरायन मॉलच्या फुड कोर्ट मधे अल्पोपहारा साठी बर्गर दिल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. अनेक मुला मुलींनी आजचा दिवस आमच्या साठी खास होता सायंन्स प्रदर्शनाने खुप माहिती मिळाली असे सांगीतले. ऑरायन मॉल चे मालक व कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण चे अध्यक्ष मंगेश परुळेकर यांनी सांगीतले की , समाजाच्या तळागाळा तील मुलांची या सायंन्स प्रदर्शना मुळे शिकण्याची गोडी वाढावी , त्यांना प्रेरणा मिळावी हा ऊद्देश या मागे आहे . मुलांच्या चेहर्या वरचा आनंद पाहुन बरे वाटले व शिक्षकांनी ही आम्हाला धंन्यवाद दिले .असेच ऊपक्रम आम्ही पुढेही राबवणार आहोत असे ते म्हणाले. या सामाजिक ऊपक्रमा साठी कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण पनवेल संस्थे तर्फे श्री शाम वालावलकर, अक्षय वालावलकर निशा वालावलकर , भाऊ सामंत , यतीन ठाकुर उपस्थित होते.

## वादळी वाऱ्यासह पाऊसाने रत्नागिरी जिल्यात मोठ्या प्रमाणात नुकसान

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी**
**योगेश सुतार**
हवामान विभागाने दिलेल्या ईशार्यानुसार काल रत्नागिरी जिल्हयाला मान्सूनपूर्व झालेल्या पावसाने अक्षरश रत्नागिरी झोडपून काढले. काल सायंकाळी विजेच्या लखलखाटसह व ढगाच्या कडकडटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. वेरवळी बोगद्याजवळ दरळ कोसळल्याने रत्नागिरी रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतूक जवळपास अडीच तासाने पुर्ववत करण्यास प्रशासनाला यश आले आहे. तर मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग वर चिखलाचे साम्राज्य पहायला मिळाले .
रविवारी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जाहीर केला होता. परंतु रविवारी दुपारनंतर गायब झाला होता. यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील तापमानात कमालीची वाढ झाली होती. परंतु मंगळवारी दुपारनंतर पावसाने चांगलेच रुप धारण करत रत्नागिरी कराची चांगलीच तारांबळ उडवली. सायंकाळी जोरदार पावसाला सुरुवात झाल्याने शासकीय कार्यालयातील कर्मचार्यांना ऑफिस मध्ये च ताटकळत रहावे लागले. तर दुपारनंतर खरेदी साठी आलेल्यानची मात्र चांगलीच फजिती झाली तर दापोली येथील वाकवली येथील शंकर विठोबा जंगम यांच्या गुरूच्या गोठ्यावर विज कोसळून गुराचा गोठा पुर्ण जळून खाक झाला. परंतु नागरिकांनच्या प्रसंगवसाधामुळे गोठ्यावतील गुरांना वाचवण्यात यश आले. तर शंकर वाडी येथील मुनावर नाईक व आयुब नाईक हे एक कार्यक्रमासाठी निघत असताना अचानक घरावर पडुन झालेल्या मोठ्या आवाजाने संपुर्ण कुटुंब भयभीत झाले आहे परंतु नंतर कळ की घरावर असणाऱ्या पाण्याच्या टाकीवर विज पडल्याने घरातील सी सी टी व्ही टीव्ही सह सर्व ईलेक्ट्रॉनिक साधनानचा पुर्ण नुकसान झाले आहे. सुदैवाने जिवित हाणी झाली नाही. मात्र अचानक झालेल्या या घटनेनंतर नाईक कुटुंबाला चांगलाच धक्का बसला आहे. महसूल विभागाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून पंचनामा केला आहे. या झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील जनजीवन मात्र विस्कळीत झाले आहे.

# भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ पनवेलमध्ये महाविकास आघाडीची तिरंगा यात्रा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):** जम्मू काश्मीर येथील पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले. भारतीय लष्कराचे मनोबल उंचावण्यासाठी पनवेलमध्ये बुधवारी (दि. २१ मे) सकाळी १० वाजता महाविकास आघाडीच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले नागरिक आणि दहशतवाद्यांविरोधातील कारवाईत शहीद जवानांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तिरंगा यात्रेत महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील व्यक्तीरेखेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यात्रेच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला




पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. तर पनवेल शहरातून यात्रा काढून काँग्रेस भवन येथे तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला. यावेळी देशभक्तीपर गीतांच्या सुरावटीत भारत मातेचा जयजयकार करण्यात आला. तसेच 'पाकिस्तान मुर्दाबाद- आतंकवाद मुर्दाबाद' म्हणत दहशतवादी कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या हाती 'तिरंग्याखाली चालतो भारत मातेला वंदन करतो, हिंदुस्थान जिंदाबाद, भारत माता की जय, भूदल नौदल हवाईदल जिंदाबाद, भारतीय सैन्याचे आभार, दहशतवाद्यांचा खात्मा भारतीय सेनेचा अभिनंदन, सैन्याच्या सन्मानार्थ भारतीय नागरिक एकत्र', अशा घोषणा लिहिलेले फलक होते. यावेळी 'हिंदुस्तान जिंदाबाद- पाकिस्तान मुर्दाबाद, दूध मांगोगे तो खीर देंगे काश्मीर मांगोगे तो चीर देंगे' अशा घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी माजी आमदार हुस्नबानू खलीफे, पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिकापचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, जिल्हा चिटणीस राजेश केणी, अनिल ढवळे, माजी नगरसेवक लतीफ शेख, नगरसेविका शशिकला सिंग, निर्मला म्हात्रे, युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कॅप्टन कलावत,अवचित राऊत, दीपक घरत, नोफिल सय्यद, अमित लोखंडे, जसविंदर सैनि, शशिकांत बांदोडकर,सुरेश पाटील,कांती गंगर, बबन केणी, शिल्पा पाठक, मनोज बिरादार,सुदेशना रायते,जयश्री खटकले, आरती ठाकूर नीता शेनोय, कलावती माळी, माधुरी गोसावी, यतीन देशमुख, अरुण कुंभार, शौकत खान, प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, विलास फडके, देवेंद्र मडवी,जयेश लोखंडे, चेतन म्हात्रे,रमेश राव, रमेश गोवारी,प्रविण जाधव, विश्वनाथ मते, किरण सोनावणे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण नेरुळ आणि उरण बेलापूर रेल्वे सेवेला अनेक समस्यांचा विळखा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**
अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उरण-नेरुळ तसेच उरण - बेलापूर लोकल सेवा दिनांक १२ जानेवारी २०२४ उरणकरांच्या मागणीनुसार सुरू झाली. उरण नेरुळ व उरण बेलापूर लोकल ट्रेन सुरू झाल्याने उरणकरांचा पनवेल नवी मुंबई ते मुंबई प्रवास जलद झाला . उरण चा औद्योगिक विकास झाल्याने नोकरवर्ग, विद्यार्थी , व्यावसायिकांची संख्या वाढली आहे. रेल्वे सेवा सुरू झाली त्यामुळे उरणकरांचा प्रवास अति जलद झाला प्रवासी संख्या ही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र लोकल फेऱ्यांची संख्या कमी असल्याने उरणकरांची परवड होत आहे. त्यामुळे लोकलच्या फेऱ्या एक तासाऐवजी प्रत्येक पंधरा मिनिटाला असावी, तसेच उरण सीएसटी लोकल उरण ठाणे लोकल ताबडतोब चालू करण्यात यावी व बेलापूर ते उरण रस्त्यावरील मालवाहतूक हा सगळा जीवघेणा प्रवास टाळण्यासाठी हजारो प्रवासांच्या हितासाठी सरकारने व रेल्वे बोर्डाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा ही मागणी प्रवाशांना संघटित करून प्रवाशांच्या वतीने डॉक्टर नितीन दिघे यांनी केले आहे. हजारो महिला, विद्यार्थी , ज्येष्ठ नागरिक, सर्वसामान्य नोकरवर्ग या लोकलने प्रवास करत आहेत, त्यामुळे माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी या विषयाची दखल घेऊन ताबडतोब निर्णय घ्यावा अशी विनंती सर्व प्रवाशांना संघटित करून प्रवाशांच्या वतीने डॉक्टर नितीन दिघे यांनी केले आहे. उरण नेरूळ किंवा उरण बेलापूर लोकल प्रत्येक पंधरा मिनिटाला असावी याला कारण उरण, बामन डोंगरी ,खारकोपर एकंदर सर्वच स्टेशन वरील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन हि मागणी जोर धरू लागली आहे. सर्वसामान्य नागरिक ,गोरगरीब,चाकरमानी मुंबई नवी मुंबई येथे घर घेऊ शकत नसल्यामुळे, त्याचप्रमाणे रेल्वे सेवा सुरू होण्यापूर्वी सरकार आणि बिल्डरने जाहीर केले होते लोकलसेवा प्रवाशांच्या सोयीसाठी जास्तीत जास्त फेऱ्या केल्या जातील ,पण या त्यांच्या भुलथापा आहेत हे आता प्रवाशांच्या लक्षात आले आहे. कामाला जाणेयेणे सोयीचे व्हावे म्हणून बहुतेक नोकरवर्गाने आपली कमाई, कर्ज काढून उरण नेरुळ मधील विकसित होणाऱ्या वेगवेगळ्या नोडमध्ये घरे घेतली आहेत, परंतु उरण नेरूळ किंवा सीबीडी बेलापूर या प्रत्येक तासाला असणाऱ्या लोकलच्या फेऱ्या ह्या सर्वसामान्यांच्या धावपळीच्या जीवनामध्ये अत्यंत त्रासदायक ठरत आहेत याशिवाय लोकलचे टायमिंग सकाळी पाच वाजल्यापासून किंवा रात्री उशिरा साडेदहा नंतर नसल्यामुळे कामगार वर्गासाठी खूप गैरसोयीचे होत आहे. सेकंड शिप किंवा उशिरा कामावरून उशीर झाल्यास प्रवाशाला




अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्याच्या खिशालाही कात्री लागत आहे. कारण कामावरून येण्यास उशीर झाल्यानंतर पर्याय म्हणून बस किंवा रिक्षाने प्रवास करावा लागत आहे .एक बससाठी चार-पाच बसचे प्रवासी लाईन मध्ये उभे असतात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या महिला भगिनींना गर्दीतून स्वतःच्या घरी जाण्यासाठी आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. त्याचप्रमाणे जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अथक प्रयासाने लोकल सेवा चालू झाली आहे खरी परंतु अफाट गर्दीमुळे सर्वसामान्य नोकरदार वर्ग ,महिला वर्ग आपला बहुमूल्य वेळ या लोकल प्रवासामध्ये घालवत आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबालाही वेळ देण्यास त्याच्याकडे वेळ नाही. या भागातील विद्यार्थ्यांसाठी कॉलेज किंवा उच्च शिक्षण घेण्यासाठी मुंबई नवी मुंबई हा प्रवास दररोज करावा लागतो ,त्याचप्रमाणे उरण मध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा नसल्याने रुग्णासाठी मुंबई किंवा नवी मुंबई गाठावी लागत आहे .त्यात एक तासाला लोकल असल्यामुळे विद्यार्थी नोकरदार वर्ग महिला वर्ग ज्येष्ठ नागरिक एक तास स्टेशनवर दुसऱ्याला रेल्वेसेवेची वाट पहावी लागते. त्यामुळे त्यांचेशैक्षणिक नुकसान होत असल्याने कित्येक विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षण मुंबईत घेणे बंद केले आहे. मुंबईमधील लोकल हि "जीवनदायिनी "समजली जाते.याउलट उरण रेल्वे सेवा ही प्रवाशांना "त्रासदायिनी" ठरत आहे. लोकलची संख्या व वेळापत्रकामध्ये बदल करण्याची मागणी सर्व प्रवासी वर्गाकडून होत आहे. सकाळी ५ वाजता पहिली लोकल व रात्री साडेबारा वाजता शेवटची लोकल असल्यास सर्व सामान्य नोकरदार वर्गाला दिलासा मिळेल. उरण ते नेरूळ या विभागांमध्ये वेगवेगळ्या नोड मध्ये लोकसंख्या चार लाखांपेक्षाही जास्त असल्याने त्याचा परिणाम लोकलमध्ये अफाट गर्दी पहावयास मिळत आहे. साधारणता सर्व कार्यालयीन वेळा सर्वत्र सारख्याच असतात त्यामुळे त्या वेळेत लोकलसाठी प्रत्येक स्टेशनवर गर्दी पहावयास मिळत असते. लोकलसेवा एक तासाच्या अंतराने असल्याने हि लोकल गेली तर लगेच दुसरी मिळेल हा पर्याय नसल्याने प्रवासी वर्गाला गर्दी तून ताटकळत प्रवास करावा लागत आहे. किंवा मग ट्रॅक्स, टु व्हिलर किंवा इतर साधनांचा वापर करून धोकादायक प्रवास करावा लागत आहे.मग कसेतरी वेळेत पोहोचण्यासाठी जे एन पी ए ला ये जा करणाऱ्या ट्रेलर च्या मधुन ओव्हरटेक करून लवकर पोहचण्यासाठी तरुणाई जीवाची पर्वा न करता आपल्या चाकरी च्या ठिकाणी हजर होत आहे.या स्टंटबाजी प्रवासाने आजपर्यंत कितीतरी आईनी आपला पुत्र, पत्नी ने आपला पती तर मुलांनी आपल्या पित्याला गमावून बसले आहेत. काही महिन्यापुर्वीच २९ वर्षाच्या एका ताईची लोकल चुकल्याने स्कुटी वर जाण्यासाठीचा तीचा निर्णय नियतीने चुकीचा ठरवला व ती आपल्या प्राणास मुकली. एक लोकल गेली तर ताबडतोब दुसरी असती तर ती ताई आज जीवंत असती. आज या रेल्वे प्रवाशांना अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. फक्त रेल्वे चालू होऊन उपयोग नाही तर या सेवेतून प्रवासी नागरिकांचे हित किती जोपासले जात आहे?लोकलसेवेमध्ये सुलभता,सुरक्षितता, आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. याशिवाय अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अजून किती प्रवाशांचे जीव रेल्वे सेवेच्या गैरसोयी मुळे जातील ? याशिवाय नादुरुस्त लोकल उरण मार्गिकेवर उपलब्ध आहेत हे वर्षभरात दोन वेळा निदर्शनास आले आहे. त्यामुळे महिला , लहान मुले, जेष्ठ नागरिक व असंख्य प्रवासी त्रस्त झाले होते. सातत्याने उरण नेरूळ प्रवास करणारे हजारो गोरगरीब सर्वसामान्य प्रवासी मागणी करत आहेत की, उरण ते सीएसटी लोकल, तसेच उरण ते पनवेल लोकल ,उरण ते ठाणे लोकल करण्याची आज गरज आहे. नित्य प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा उद्रेक होऊन रस्त्यावरील इतर पर्याय धोकादायक असल्यामुळे लोकल प्रवास फायदेशीर व सर्वसामान्यांच्या आवाक्यात असल्यामुळे ताबडतोब उरण नेरूळ किंवा सीबीडी बेलापूर या मार्गावर लोकल फेऱ्या प्रत्येक पंधरा मिनिटाला करण्यात याव्यात,व असे न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन किंवा प्रवाशांचा उद्रेकाला सरकारला व रेल्वेला तोंड द्यावे लागेल. ५००० पेक्षा जास्त सिडको बामण डोंगरी लॉटरीतील घरांचा ताबा अनेकांना मिळाल्यामुळे तसेच उलव्याची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत असल्यामुळे सर्वात जास्त गर्दी बामण डोंगरी स्टेशनवर प्रवाशांची पाहायला मिळते या प्रवाशांच्या संख्येमुळे लोकल फेऱ्या जास्तीत जास्त वाढून सर्वसामान्यांना दिलासा देण्याची मागणी अजय हेगळकर तसेच त्यांचे सहकारी नरेनजी देशमुख गव्हाणगाव, हितेश शिंगरे, स्वप्निल घाडगे ,दिनेश पवार, बाबाजी कोकाटे यांनी देखील केली आहे. त्याचप्रमाणे उरण लोकल संदर्भात वेगवेगळे मागण्यांचे निवेदन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे गेल्या एक वर्षापासून प्रवाशांच्या वतीने चव्हाण मॅडम यांनी देखील दिलेले आहे. तरीही अजूनही रेल्वे बोर्डात जाग आलेली नाही. सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ रामभाऊ सारुक सर यांनीही लोकल फेऱ्या एक तासाने असल्यामुळे सर्वसामान्यांना होणाऱ्या त्रासा संदर्भामध्ये आवाज उठवलेला आहे. आणि आता डॉक्टर नितीन दिघे सरांनी देखील प्रवाशांच्या वतीने, या लोकलसेवेत रोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एकत्र करून, त्यांचे संघटन करून लोकलच्या फेऱ्या वाढण्यासाठी प्रवाशांना संघटित करून प्रवाशांच्या वतीने डॉक्टर नितीन दिघे यांनी माननीय मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना या विषयाची दखल घेऊन, ताबडतोब निर्णय घ्यावा असा विनंती अर्ज सर्व प्रवाशांच्या वतीने करण्यात येणार आहे. "झोपी गेलेल्यास जागे करता येते पण झोपेचे सोंग करणाऱ्यास जागे करता येत नाही " असे प्रवासी वर्गाकडून बोलले जात आहे. त्याचप्रमाणे एकीचे बळ हे सर्वोच्च असते त्यामुळे संघटीत होऊन लोकल फेऱ्या वाढविण्यासाठी चे आंदोलन छेडण्याचा इशारा प्रवासी वर्गाकडून दिला जात आहे.

## असाह्य निराधारना अन्न पूर्वीणाऱ्या जिव्हाळ्याच्या भिंत घाटंजी ला पांढरकवडा येथिल खेतानी ग्रुप तर्फे अन्नधान्याची मदत

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**



घाटंजी/पांढरकवडा: समाजातील असहाय्य आणि निराधार व्यक्तींना आधार देण्यासाठी 'जिव्हाळ्याची भिंत' हा अभिनव उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत, घाटंजी आणि पांढरकवडा येथील खेतानी ग्रुपने गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप करून माणुसकीचे दर्शन घडवले आहे. खेतानी ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत, 'जिव्हाळ्याची भिंत' या उपक्रमाला सक्रिय सहकार्य केले आहे. या अंतर्गत, अनेक निराधार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबांना जीवनावश्यक अन्नधान्याची मदत पोहोचवण्यात आली. या स्तुत्य उपक्रमामुळे अनेक घरांमध्ये चुली पेटल्या असून, गरजूंच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले आहेत. यावेळी बोलताना खेतानी ग्रुपच्या प्रतिनिधींनी सांगितले की, "समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून आम्ही हा छोटासा प्रयत्न करत आहोत. 'जिव्हाळ्याची भिंत' हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे आणि आम्हाला त्याचा एक भाग होताना आनंद होत आहे. भविष्यातही आम्ही अशा सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय सहभाग घेत राहू." 'जिव्हाळ्याची भिंत' या उपक्रमाचे आयोजक आणि स्थानिक नागरिकांनी खेतानी ग्रुपच्या या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांच्या या सहकार्यामुळे अनेकांना मोठा दिलासा मिळाला असून, इतरांनाही सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## "रेवदंडा बसस्थानक: डोंगराएवढ्या समस्या, जबाबदार कोण ?"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान अंतर्गत राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागातून आलेल्या मुल्यांकन समितीने नुकतीच रेवदंडा बसस्थानकाची पाहणी केली. मात्र, या बसस्थानकाच्या दुरवस्थेचे दृश्य पाहून प्रवाशांना पडलेला एकच प्रश्न या दुर्दशेला जबाबदार कोण? ठाणे विभागीय वाहतूक अधिकारी रमेश बांदल यांच्या मार्गदर्शनाखाली ही पाहणी झाली. त्यांच्यासमवेत कर्मचारी कृष्णा बन व रेवदंडा बसस्थानक वाहतूक नियंत्रक देवराज राऊतही उपस्थित होते. प्रवाशांकडून थेट मुल्यांकन घेण्यात आले प्रश्न होते, तक्रारी होत्या आणि एक आक्रोश होता "आम्हाला प्रवास करायचा आहे, संघर्ष नव्हे !"मुंबई, पुणे,ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांशी जोडणारा रेवदंडा हा बसस्थानक अलिबाग, रोहा, मुरुडकरांसाठी एक महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू. पण बसस्थानकाचा आजचा चेहरा पाहिला, तर वाटते हे 'केवळ' एक जागेवरचं नाव आहे सोयी काही नाहीत, व्यवस्थापन नाही आणि जबाबदारी तर कोणीच घेत नाही.बसस्थानक परिसरात ठिकठिकाणी मोठाले खड्डे पडले असून, पावसाळ्यात हेच खड्डे चक्क तलावात रूपांतरित होतात. प्रवाशांना चिखल, पाणी आणि धोक्याच्या कड्यावरून प्रवास करावा लागतो. तक्रारी केल्या जातात, पण त्यांचे उत्तर अद्याप रस्त्यावरच पडून आहे! त्यात भर म्हणून बसस्थानक परिसरात बिनधास्त अवैध पार्किंग. गाड्यांची गर्दी, वाहनांची कोंडी आणि प्रवाशांची कुचंबणा हे चित्र रोजचं झालंय. स्थानिक नागरिक व प्रवासी वर्ग याबाबत वेळोवेळी आवाज उठवत आहेत, पण 'प्रशासन' नावाचा कुणी जागच होत नाही! रेवदंडा बसस्थानकाच्या बकाल अवस्थेला जबाबदार कोण? हा सवाल आता जनतेचा आहे. समिती पाहणी करून गेली, गुण दिले गेले, पण जर त्यातून काही ठोस कृतीच होणार नसेल, तर हे सगळं नाटकच आहे का?
सत्ता असो वा यंत्रणा रेवदंडा बसस्थानकाच्या दुरवस्थेचा ठपका आता कुणावर ठेवायचा? की जनताच पुन्हा एकदा हतबलतेने हे सगळं सहन करत राहणार?
"बस पकडण्या ऐवजी खड्ड्यांशी झुंज द्यावी लागते" ___ वैभव नाईक
"स्वच्छता मोहिम आली पण बसस्थानकाची हालत तशीच!" – लता जाधव, स्थानिक महिला

## उरण बोरी गावातील सौ रेश्मा रवी सतेरे यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**
**उरणप्रतिनिधी/सायली साळुंके**



उरण शहरातील बोरी गावातील रिक्षा चालक रवि भीकोबा सतेरे यांच्या पत्नी सौ रेश्मा रवि सतेरे यांचे मंगळवारी दिनांक 20 मे2025रोजी सकाळी 9:15 च्यादरम्यान राहत्या घरीवयाच्या 59 व्या वर्षी दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले त्यांच्या जाण्याने बोरी गावावर शोक कळा पसरली असून त्यांच्या पार्थिव देहावर बोरी गावातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत यात्रेत बोरी गावातील जनसमुदाय, मीत्र परिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते त्याचे पश्चात पती मुलगा मुलगी जावई नातू असा परिवार आहे त्यांचे
दशक्रिया कार्य गुरुवारी 29मे 2025 रोजी श्रीक्षेत्रमाणकेश्वर केगांव येथे होणार असून उत्तरकार्य रविवार 1जून 2025 रोजी रहात्या घरी होणार आहे.

# देश घडविण्यासाठी इतिहास, संस्कृती आणि महापुरुषांचे कार्य समजून घेणे आवश्यक – माजी आमदार मधू चव्हाण

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भाजपचा "सामाजिक पर्व" उपक्रम

**दैनिक युवक अध्यक्ष**
**पनवेल (प्रतिनिधी)**




देश घडवायचा असेल तर देशातील नागरिकांनी आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि महान व्यक्तींच्या कार्याची जाणीव ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार मधु चव्हाण यांनी आज येथे केले. भारतीय जनता पक्षाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त २१ मे ते ३१ मे या कालावधीत "सामाजिक पर्व" म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या समाज सुधारणेतील योगदान, प्रशासनातील पारदर्शकता, महिला सक्षमीकरणासाठीचा दृष्टिकोन आणि सांस्कृतिक वारसा यांचा नव्या पिढीला परिचय करून देण्याचा भाजपचा प्रयत्न असून त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्हा भाजपच्यावतीने जिल्हा व तालुका मंडल स्तरावर विविध कर्यक्रमांचे आयोजन करून "सामाजिक पर्व" मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या 'सामाजिक पर्व'च्या नियोजनासंदर्भात उत्तर रायगड जिल्हा भाजपची कार्यशाळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पार पडली. त्यावेळी प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी व्यासपीठावर भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, सिद्धार्थ बांठिया, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते. या कार्यशाळेला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, विविध सेल, मोर्चा, प्रकोष्ठचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची माहिती व कार्य तळागाळात पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून हे सामाजिक पर्व त्यांच्या जीवनावर आधारित आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये जिल्हास्तरावर युवक भव्य मेळावा. वेशभूषा स्पर्धा, महिला मेळावा, महिला मॅरेथॉन, बुद्धीजीवी संमेलन, नाटक, पथनाट्य, चित्ररथ, प्रदर्शनी, रांगोळी स्पर्धा, तर मंडल स्तरावर मंदिर घाट व मठ स्वच्छता, महाआरती, शंखनाद, वेद पठण, भक्तीगीत, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, तसेच बूथ स्तरावर स्टिकर व पत्रक वाटप अशी कार्यक्रमे होणार आहेत. श्री. चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "अहिल्यादेवी होळकर हे भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी आपल्या कारकीर्दीत आदर्श शासन, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि लोककल्याणाचे अद्वितीय उदाहरण सादर केले. हे 'सामाजिक पर्व' म्हणजे त्यांना दिलेली श्रद्धांजलीच आहे.या कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला इतिहासाशी नातं जोडून सामाजिक भान निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त करताना महापुरुषांचा इतिहास कायम स्मरणात रहावे आणि युवा पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी असे उपक्रमे महत्वपूर्ण असल्याचेही त्यांनी नोंदीत केले. महापुरुषांना एकाच समाजाने मानावे हा समज दूर झाला पाहिजे त्यासाठी प्रत्येक महापुरुषांचा प्रत्येक समाजाने जयंती व इतर कार्यक्रम साजरे केले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मते मिळावी म्हणून भाजप कार्यक्रम करत नाही तर तळागाळात सर्व घटकात आपल्या देशाचा गौरवशाही इतिहास पोहोचला पाहिजे, यासाठी सतत उपक्रम राबविले जातात, असेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी प्रास्ताविकातून जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सामाजिक पर्वाची तसेच या उपक्रमाच्या संदर्भात नियोजन कमिटीची जबाबदारीची माहिती दिली.

या कार्यशाळेच्या निमित्ताने यावेळी उत्तर जिल्हा भाजपच्या अध्यक्षपदी पुनर्निवड झाल्याबद्दल अविनाश कोळी, तसेच जिल्ह्यातील तालुका मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, भूपेंद्र पाटील, सुमित झुंझारराव, दशरथ म्हात्रे, अमर पाटील, विकास घरत, राजेश लाड, प्रसाद भोईर, प्रवीण मोरे, रुपेश धुमाळ, मंगेश वाकडीकर, धनेश गावंड, राहुल जाधव, दिनेश खानावकर, दिनेश रसाळ, नरेश मसणे, सनी यादव यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## गोंदिया जिल्हा पोलीस दादालोरा खिडकी योजनाअंतर्गत पोलीस मुख्यालय, कारंजा, गोंदिया येथे बहुविध कार्यक्रम संपन्न...


**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया प्रतिनिधी**

गोंदिया जिल्हयातील आदिवासी युवक-युवतीं यांच्या कलागुणांना वाव देवून त्यांना नवीन कौशल्य शिकविणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, समुदायाची भावना विकसीत करणे, तसेच विद्यार्थ्यांना वैयक्तिक आवड जपता यावी व स्वतःचा विकास करता यावा यासाठी मा. श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्या संकल्पनेतुन व श्री. नित्यानंद झा, अपर पोलीस अधीक्षक गोंदिया, कॅम्प देवरी यांचे मार्गदर्शनाखाली "पोलीस दादालोरा खिडकी योजना" अंतर्गत गोंदिया जिल्हा पोलीस दल व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांचे संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालय गोंदिया येथे दिनांक- १९/०५/२०२५ रोजी विद्यार्थ्यांना नेमबाजी (शुटींग) खेळप्रकार, पोलीस विभागाची कार्यपद्धती व इतर विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी १ दिवसीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. सदर भेटीकरीता आलेल्या ३९ विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नेमबाजी (शुटींग) खेळाबद्दल रुची निर्माण व्हावी, याकरीता विद्यार्थ्यांना नेमबाजी (शुटींग) खेळाबद्दल मार्गदर्शन करुन प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक सराव घेण्यात आले... तसेच यादरम्यान पोलीस विभागातील तज्ञ अधिकारी/अंमलदार यांनी विद्यार्थ्यांना पोलीस दलाचे आधुनिकीकरण, हत्यार, दारुगोळा, विविध आधुनिक शस्त्रास्त्रे, त्याचप्रमाणे श्वान पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक यांच्या कार्यपद्धती बद्दल, पोलीस विभागामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कशाप्रकारे गुन्हयाची उकल करुन आरोपीतांचा शोध घेण्यात येतो याबद्दल सविस्तर माहिती दिली. सदर उपक्रमाप्रसंगी पोलीस अधीक्षक गोंदिया, मा.श्री. गोरख भामरे, यांनी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेवुन त्यांना उज्ज्वल भवितव्याबद्दल मार्गदर्शन केले. उपरोक्त उपक्रमाबरोबरच गोंदिया जिल्हा पोलीस दल आणि आदिवासी कल्याण समिती, रोटरी इंटरनॅशनल जिल्हा ३०३०- नागपूर, जिवन आधार बहुउद्देशीय संस्था, तसेच जिंजर हॉटेल, गोंदिया, यांचे संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थान (MGIRI) वर्धा येथे गोंदिया जिल्हयातील पोलीस स्टेशन चिचगड अंतर्गत सशस्त्र दुरक्षेत्र पिपरखारी येथील एकुण १० प्रशिक्षणार्थ्यांना दिनांक १६/०४/२०२५ ते १६/०५/२०२५ पर्यंत १ महिन्याचे बांबु क्राफ्ट प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात आले होते. सदरचे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना देखील दिनांक- १९/०५/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय कारंजा गोंदिया येथे पाचारण करुन त्यांनी प्रशिक्षणादरम्यान तयार केलेल्या बांबु क्राफ्ट च्या विविध वस्तुंची प्रदर्शनी भरविण्यात आली. सदर उपक्रमादरम्यान पोलीस अधीक्षक, गोंदिया यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थ्यांना भेट देवून त्यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. उपरोक्त दोन्ही उपक्रम हे पोलीस मुख्यालय, कारंजा, गोंदिया येथील प्रेरणा सभागृहात संपन्न झाले... सदर कार्यक्रमात श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक, गोंदिया, श्री. उमेश काशीद, प्रकल्प अधिकारी, आदिवासी प्रकल्प विभाग देवरी, श्रीमती सरीता रहांगडाले, व्यवस्थापक, जिंजर हॉटेल, गोंदिया, तसेच गोंदिया जिल्हा पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार व जिल्हयातील नक्षलग्रस्त भागातील प्रशिक्षणार्थी हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्रीकांत हत्तीमारे, पोलीस उप-निरीक्षक, गोंदिया यांनी केले.



## कोरम मॉलतर्फे 'कोरम समर बूट कॅम्प २०२५' चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**ठाणे,वार्ताहर**



ठाणेस्थित कोरम मॉलने पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधणारा आणि ४ ते १४ वयोगटातील मुलांसाठी आवडता असा 'कोरम समर बूट कॅम्प २०२५' चे आयोजन केले आहे. या समर बूट कॅम्पमुळे कोरम मॉलचे ॲट्रिअम एक सजीव, क्रियाशील आणि रोमांचक इनडोअर प्लेग्राउंडमध्ये रूपांतरित झाले आहे .ठाण्याचा इनडोअर ॲडव्हेंचर कॅम्प म्हणून ओळखला बहुप्रतीक्षित हा कॅम्प ८ जून २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. हा समर बूट कॅम्प २०२५ दररोज दुपारी १२ ते रात्री ८ वाजेपर्यंत खुला असणार आहे, जिथे लहान मुलांसाठी मजा आणि साहसाने भरलेला पूर्ण दिवस अनुभवता येतो. या कॅम्पमध्ये कोरम मॉलमध्ये रुपये २,००० किंवा त्याहून अधिकची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना एका मुलासाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. त्यामुळे खरेदीचा आनंद आणि मुलांसाठी खास अनुभव एकत्र मिळतो. याव्यतिरिक्त, या समर बूट कॅम्प मध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेश फी प्रती मुलासाठी रुपये २९९/- एवढी असून बुकमायशो वर (BOOKMYSHOW) तिकीटे उपलब्ध आहेत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेला हा समरबूट बूट कॅम्प मुलांच्या शारीरिक विकासासाठी उपयुक्त अशा क्रियाकलापांवर आधारित आहे, जे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजच्या यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मुलांचे बौद्धिक व सामाजिक संतुलन राखण्यासाठी हालचाल कौशल्य, सामर्थ्य व समन्वय शिकवण्यावर भर दिला आहे. साहसी आणि समूहाधारित उपक्रमांमुळे त्यांची टीमवर्क क्षमता, आत्मभान व संवादकौशल्य विकसित होतात. या बूट कॅम्पमध्ये काही नव्या साहसी ॲक्टिव्हिटीजचा समावेश करण्यात आला आहे ज्या मुलांसाठी रोमांचक ठरणार आहेत – जसे की प्लँक वॉक, ज्यामध्ये मुले अरुंद उंच मार्गावरून समतोल मार्गक्रमण करतात. तर बर्मा ब्रिज, जो लोंबकळत्या दोरांवरून चालण्याचा अनुभव देतो आणि समन्वय व धैर्य वाढवतो; तसेच टायर वॉक, ज्यामध्ये मुले लटकणाऱ्या टायरवरून चालत जातात . यामुळे त्यांची चपळता आणि ताकद वाढते. हे सर्व उपक्रम मॉलच्या सुरक्षित वातावरणात बाह्य साहसी अनुभवाची मजा देण्यासाठी डिझाइन केले गेले आहेत. एकत्रितपणे, ही सर्व अडिशन्स मुलांसाठी त्यांच्या क्षमतेची सुरक्षित व आधारभूत वातावरणात तपासणी करण्यासाठी एक रोमांचकारी आणि उत्साही साहसाची जागा निर्माण करतात. या सेटअपमध्ये समाविष्ट आहे

**प्लँक वॉक**
**बर्मा ब्रिज**
**टायर वॉक**
**टायर क्लाइंब**
**रॉक क्लाइंब**
**झिप लाइन**
**माऊंटन रॅपलिंग**

या प्रत्येक उत्साहवर्धक अक्टिव्हिटीतून मुलांना शारीरिकदृष्ट्या स्वतःला आव्हान देण्याची प्रेरणा मिळते आणि एक अविस्मरणीय अनुभव मिळतो. साहसापलीकडे, समर बूट कॅम्प हे एक सर्वांगीण सहभागाचे व्यासपीठ आहे, ज्यामध्ये कला व हस्तकला, बलून स्कल्प्टिंग आणि इतर सर्जनशील क्षेत्रांतील कार्यशाळांचा समावेश आहे, त्यामुळे प्रत्येकाच्या आवडीसाठी काहीतरी नक्कीच आहे. संपूर्ण अट्रियमला एका मनोरंजन केंद्रामध्ये रूपांतरित करण्यात आले आहे, जे पालकांसाठी एक दृश्यरम्य आनंद आणि लहान सहभागींसाठी एक संस्मरणीय अनुभव देते. हा कॅम्प उन्हाळी सुट्टीदरम्यान चालेल, त्यामुळे मुले सक्रिय, गुंतलेली आणि आनंदी राहतील.

# आदित्य, तुलसी, वसंतराव काळे सहित 233 महाविद्यालयांना प्रवेश बंदी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**

बीड -बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून संलग्नित असलेल्या 233 महाविद्यालयांना 2025- 26 या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला निर्बंध घालण्यात आलेले असून या महाविद्यालयांनी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश देऊ नये असे आदेश देण्यात आले आहेत यामुळे संलग्निकरण यादीतील 484 महाविद्यालयापैकी 233 महाविद्यालयात या नव्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार नाही.




विद्यापीठाकडून महाविद्यालयावर करण्यात आलेल्या या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे . याबाबत माहिती अशी की विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या 21 नोव्हेंबर 2024 रोजी च्या ठरावानुसार कुलुगुरु डॉ. विजय फुलारी यांनी याबाबतचे आदेश दिले होते, यासंदर्भात शैक्षणिक विभागासह प्र कुलगुरू डॉ. वाल्मीक सरोदे यांनी वारंवार सूचना देऊनही महाविद्यालयाने ट्रिपल ए मूल्यांकनाबाबत उत्सुकता दाखवली नाही. त्यामुळे अधिष्ठाता मंडळाने अशा 233 महाविद्यालयावर कारवाईचा बडगा उगारला असून या महाविद्यालयावर प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे. NAAC मूल्यांकनासाठी पात्र असूनही 233 महाविद्यालयांनी मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली नव्हती त्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे. विद्यापीठाच्या अधिपत्याखाली खालील छत्रपती संभाजीनगर, बीड ,जालना आणि धाराशिव या चार जिल्ह्यातील महाविद्यालयामध्ये विविध कला वाणिज्य विज्ञान संगणक व्यवस्थापन फार्मसी आर्किटेक्चर पत्रकारिता अशा शाखांचे विविध अभ्यासक्रम चालवले जातात मात्र झिरो इंटेक ही टिप्पणी देऊन प्रवेशाला स्थगिती देण्यात आलेली आहे . कोणकोणत्या महाविद्यालयावर प्रवेशबंदी घालण्यात आली त्या २३३ महाविद्यालयांची यादी खालीलप्रमाणे. आदित्य कॉलेज ऑफ एम्बीए बीड,सूर्योदय ग्रामीण विकास संस्था राजश्री शाहू अध्यापक महाविद्यालय मोरेवाडी, अंबाजोगाई,आर्टस् -सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कुसळंब,अपेक्स आयटी कॉलेज माजलगाव,मकसूद सेवाभावी संस्था संचलित डॉ अब्दुल कलाम कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलोजी कॉलेज नेकनूर,कॉलेज ऑफिस एज्युकेशन फॉर ऊमन, बीड,केशवराज सिनियर कॉलेज, दासखेड, ता पाटोदा,महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बीड.साईराम आर्टस्, सायन्स कॉलेज, युसूफ वडगाव. भाऊसाहेब कॉलेज ऑफिस एज्युकेशन, केज.स्व रामचंद्र धस कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स आष्टी.संभाजीराजे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स, शिरूर कासार.श्री बी एस पी एम अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई. जनता आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धानोरा.अध्यापक महाविद्यालय कारी.आदित्य इंजिनिअरिंग कॉलेज, बीड. एस.एस पी एम कॉलेज ऑफ एज्युकेशन आष्टी.जनशिक्षण महाविद्यालय आपेगांव. राजमाता जिजाऊ आर्टस् अँड सायन्स कॉलेज, मादलमोही.कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, अंबाजोगाई.आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपळनेर.कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन आष्टी.ज्ञानवर्धिनी बी सी ए अँड बी सी एस कॉलेज.जवाहरलाल नेहरू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज परळी. गुरुकुल कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड आयटी, बीड.एन एस एस आर आर्टस्, सायन्स कॉलेज, तेलगाव.डॉ विश्वनाथराव कराड कॉलेज ऑफ एज्युकेशन, केज.संत भगवानबाबा एम एड कॉलेज केज.श्री गुरु वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज आर्टस् कॉलेज मानूर.आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अंमळनेर.एस. एस. पी. एम. एस.आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, धानोरा. राजीव गांधी आर्टस्, सायन्स कॉलेज रायमोह.गुरुकुल कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड.महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, चौसाळा.संभाजीराजे कॉलेज ऑफ लायब्ररी अन मॅनेजमेंट सायन्स, बीड. तुलसी कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड आयटी बीड.छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड मॅनेजमेंट.गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन अंबाजोगाई. आदित्य कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड. श्री मोरेश्वर कॉलेज गंगामसला ता माजलगाव.स्वामी विवेकानंद कॉलेज परळी. श्री तांबवेश्वर कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलोजी केज.आर्टस् अँड सायन्स कॉलेज आष्टी. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अध्यापक महाविद्यालय गढी.आर्टस् अँड सायन्स कॉलेज चकलंबा.छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड.संत भगवानबाबा आर्टस् अँड सायन्स कॉलेज, घाटशिल पारगाव.स्व. शंकरराव गुट्टे ग्रामीण आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धर्मापुरी.जीवनदीप आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपळनेर.वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नलिझम अँड कॉम्पुटर सायन्स बीड.शाम गदळे आर्टस् कॉलेज दहिफळ.त्वरितापुरी आर्टस् अँड सायन्स कॉलेज तलवाडा.नालंदा कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स आष्टी.स्व रामचंद्र दादा धस सिनियर कॉलेज,देऊळगाव घाट आष्टी.पदमश्री अप्पासाहेब पवार सिनियर कॉलेज बरदापूर.कॉलेज ऑफ फार्मास्युटीकल सायन्स अँड रिसर्च आष्टी. मराठवाडा कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड.गुरुकृपा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी माजलगाव.किशोरी कॉलेज ऑफ एम बी ए बीड.सुरज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट बीड.मिठूलालजी सारडा कॉलेज ऑफ एम बी ए बीड.आर्टस् अँड सायन्स कॉलेज मारफला.जीवन शिक्षण सायन्स कॉलेज केज.

## शेतकऱ्यांसाठी ग्रामपंचायत स्तरावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करा.

### (मनसेची कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी)(मनसेची कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी)



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

तालुका कृषी कार्यालया अंतर्गत असलेल्या मंडळ कृषी अधिकारी हे आपल्या कार्यक्षेत्रात दौरा,शिवार भेट,किंवा मार्गदर्शन शिबिर न घेता सर्व कागदोपत्री दाखवुन शासनाच्या निधीची लूट करीत आहेत. त्यामुळे मागील काळात घेण्यात आलेल्या सर्व कार्यशाळा,मार्गदर्शन शिबिराची माहिती घेतल्यास सर्व गौड बंगाल बाहेर येईल.
**:- शंकर वरघट (उपजिल्हाध्यक्ष मनसे यवतमाळ)**

**राळेगाव:**-शेतकऱ्यांना शेतीमध्ये पिके घेण्यास अनेक अडचणी येत असल्याने कोणते बियाणे , खते,कीटकनाशके वापरण्यात यावी,उत्पादन वाढीसाठी कोणते प्रयोग शेतात करावे? याकरिता मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने ग्राम पंचायत स्तरावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात यावे अशी मागणी मनसेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.गेली कित्येक वर्षापासुन शेतकऱ्यांच्या पाठीमागे संकटाची मालीका कायम आहे, तालुक्यातील शेतकरी एका पाठोपाठ एक अनेक संकटाचा सामना करीत असतांना मागील काही वर्षापासुन फवारणीतुन विषबाधा होऊन अनेकांना आपले प्राण सुद्धा गमवावे लागले तसेच ही शाई वाळते न वाळते तोच गुलाबी बोंड अळी, बोंडसडने आक्रमण करून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले. मात्र कृषी विभागाकडुन आत्तापर्यंत कुठल्याही प्रकारचे तालूक्यात या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले नाही. चालु वर्षात तालुक्यातील शेतकरी पिक पेरणी बाबत संभ्रमावस्थेत असतांना बदलत्या हवामानानुसार कोणते बियाणे,खते,कीटकनाशके वापरण्यात यावी,मातीचा पोत कसा तपासावा याकरिता कृषी विभागाकडुन राळेगाव तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करून जगाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

## पत्रकार उत्कर्ष समितीचे पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत..!

### मनोज सानप ठाणे जिल्हा माहिती अधिकारी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

डॉ. अशोक म्हात्रे यांचे कार्य खूपच कौतुकास्पद असून पत्रकार उत्कर्ष समितीचे पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत. पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी काल ठाणे जिल्हा माहिती कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे यांनी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना शाल व सन्मान चिन्ह भेट दिले.समितीचे अध्यक्ष डॉ.अशोक म्हात्रे यांनी पत्रकार उत्कर्ष समितीच्या विविध कार्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना दिली. माध्यमाचे बदलते स्वरूप बदलत्या काळात नवनवीन माध्यमांचा उपयोग याबद्दल सखोल मार्गदर्शन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी यावेळी केले. पत्रकार उत्कर्ष समितीच्या अंतर्गत करण्यात येत असलेल्या उपक्रमाचे मनोज सानप यांनी कौतुक केले पुढील उपक्रम अधिकाधिक व्यापक व्हावेत, डॉ. अशोक म्हात्रे यांचे कार्य खूपच कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पत्रकार उत्कर्ष समितीचे सचिव डॉ.वैभव पाटील, खजिनदार श्री. शैलेश ठाकूर, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष श्री. सुधीर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.




## शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलात विद्यार्थी व शिक्षकांचा गुणगौरव सोहळा.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचालित रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स या कनिष्ठ महाविद्यालयाचा फेब्रुवारी २०२५ चा १२ वी परीक्षेचा कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांचा निकाल १०० % लागला. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव समारंभ संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कला शाखेत संस्कृती धनंजय वर्तक ६७ % , विज्ञान शाखेत गौरव साईनाथ गावंड ७५.५०% व वाणिज्य शाखेत मितेश मारुती म्हात्रे ६७.५०% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिन्ही शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले




महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक ए.डी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्न, समवेत आई-वडील व गुरुजनांचा आदर करणे व सुसंस्कारीत जीवन जगण्याचा कानमंत्र दिला. तसेच सेवानिवृत्त सहाय्यक शिक्षक निरीक्षक प्रकाश पाटील यांनी आत्मविश्वास, शिस्त व त्याग याचे जीवनातील महत्त्व विशद करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश उपस्थिताना दिला. याप्रसंगी संस्थेच्या खजिनदार प्राचार्य डॉ. सुखदा म्हात्रे यांनी जीवनात ध्येय संपादन करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असा संदेश देऊन विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त करावे व स्वतः बरोबर समाजाचा गौरव वाढवावा असे प्रतिपादन केले. संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणात बारावी परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून इयत्ता बारावी नंतर कोणत्या सेवा संधी आहेत, त्या संदर्भात अभ्यासक्रम कोणते आहेत, याची माहिती दिली. ज्ञान प्रसार शिक्षण संस्थेने उरण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठीय उच्च शिक्षण सोयीचे व्हावे यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ मध्ये सुरू केलेल्या शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयातील कला, विज्ञान, वाणिज्य, तंत्रज्ञान या शाखांतील अभ्यासक्रमाची माहिती विशद केली. तसेच मुंबई विद्यापीठाची पदवी प्रक्रिया व नियमावली याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षण, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात शिक्षण करिता प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे आर्टस सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयामध्ये केलेल्या कार्याचा गौरव केला. शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ या कालावधीत प्रथम व द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमासंबंधी मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेच्या विश्वस्त मेघा म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुविद्य गावंड, सुयश म्हात्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले. शिवहरी गावंड यांनी सूत्रसंचालन केले व श्री. विलास काटे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद उपस्थित होते.

## मुंबई ऊर्जा प्रकल्प मोबदला प्रकरणात आदिवासी शेतकऱ्यांची लाखोंची फसवणूक करणारे झारितील शुक्राचार्य पकडा - गणपत वारगडा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी : मुंबई ऊर्जा प्रकल्प मोबदला देतांना आदिवासी लोकांना लुबाडून त्यांना मिळालेले** लाखों रुपये लाटणाऱ्या झारितील शुक्राचार्य असलेल्या संबंधितांवर ऍट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा.अशी तक्रार आदिवासी समन्वयक समिती रायगडचे अध्यक्ष गणपत वारगडा यांनी काही दिवसांपूर्वी पोलिसांत दाखल केली आहे. उल्लेखनीय आहे की, या ऊर्जा प्रकल्प अंतर्गत कोट्यावधी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. मात्र या नुकसान भरपाई वाटपात कायद्याचे ज्ञान नसलेल्या, गरीब आदिवासी समाजातील शेतकरी असलेल्यांना त्यांची नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यांना दिलेल्या शासनाच्या नुकसान भरपाईची लाखों रुपये रकमेचा अपहार झाला आहे. याबाबतीत पत्रकारांना मिळालेल्या माहितीनुसार मौ. नं. हेदुटणे सर्वे नं. 78 मधीलच एकूण 11 शेतकऱ्यांना पनवेल उप-विभागीय अधिकारी कार्यालय पत्र क्रमांक उविअ / भूसं /कात-5/2024/2500दि. 18/9/2024 प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आदेश पारित झाले होते. मात्र हिमनगाचे टोक म्हणून एकच प्रकरण पाहता कानपोळी-हेदुटणे येथील बाळ्या चौधरी यांना त्यांच्या मंजूर झालेल्या रकमेची भरपाई डी. डी. (धनाकर्ष) द्वारे देऊन देखील त्यांना मिळाली नाही. किंबहुना ते



स्वतः या मिळालेल्या नुकसान भरपाई बद्दल अनभिज्ञ राहिले. त्यामुळे हे प्रकरण गंभीर आहे. कारण एकाच शेतकऱ्याला मिळणारी भरपाई लाखोंची आहे. त्यामुळे प्रकल्प मधील कर्मचारी,स्थानिक दलाल, बँक अधिकारी अशी अवैध सिंडिकेट तयार होऊन यामध्ये मोठ्ठा गोलमाल झाला असावा. अशी भीतीवजा i विश्वास तक्रारदार गणपत वारगडा यांना वाटत आहे. अशा प्रकरणातील अजूनही कुणी बाधित आदिवासी असतील तर त्यांनी संस्थेशी संपर्क करावा. असें आवाहन गणपत वारगडा यांनी केले आहे.

सबब या प्रकरणी सविस्तर चौकशी करून अदा केलेल्या सर्व धनाकर्ष, धनादेश यांची गांभीर्याने चौकशी करून सत्य जगासमोर येण्यासाठी आदिवासी संघटनेच्या मार्फत पनवेल पोलिसांत याची तक्रार दाखल झाल्याने मोठी खळबळ माजली आहे.

## वादळी वाऱ्यामुळे बागायतदारांचे नुकसान, काजळेश्वर,जानोरी,पानगव्हाण येथील घटना, संत्राझाडे उखडली

**नकूल उपाध्ये / कारंजा लाडः**

कारंजा तालुक्यातील काजळेश्वर परीसरातील जानोरी ;काजळेश्वर व पानगव्हाण येथे आलेल्या चक्रीवादळामुळे दिनांक २० मे रोजी संत्रा आंबा फळ पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार कारंजा तालुक्यातील जानोरी भिंगारे, पानगव्हाण तसेच काजळेश्वर येथे दि.२० मे रोजी संध्याकाळी सुसाट चक्रीवादळ सदृष्य वाऱ्यासह प्रचंड ढग दाटून आले व विजेच्या कडकडाटासह तुफान पाऊस झाला . चक्रीवादळ सदृष्य सुसाट वाऱ्या मुळे संत्र्याच्या बागांवर वाईट परिणाम झाला असून अनेक झाडं मुळासकट उध्वस्त झाली आहेत. काही झाडं वीजेच्या तारांवर कोसळली, रस्ते उन्मळून पडलेल्या झाडांनी अडवले गेले, तर कुणाचे आंब्याचे झाड मोडून खाली पडले. यामधे शेतकऱ्यांचे फळ पीकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या संकटसमयी शासनाने नुकसानग्रस्तांचे तात्काळ पंचनामे करून योग्य ती मदत द्यावीअशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे वतीने अविनाश भिंगारे यांनी केली आहे.यावेळी वादळीवाऱ्यामुळे पानगव्हाण येथील शेतकरी शुभम अनंत सुपनर यांचे संत्रबागेतील संत्राचे झाडे उन्मळून पडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले.शेतकरी शुभम सुपनर यांनी आपल्या पानगव्हाण शिवारातील सर्वे नंबर ३० मध्ये एक हेक्टर क्षेत्रात संत्रा,मोसंबी, निंबू ,आंबे व अंजीराची लागवड केली.अशातच संत्रा झाडे ५ वर्षाची झाली असताना मंगळवारी रात्री वादळी वाऱ्यामुळे



त्यातील संत्राची काही झाडे उन्मळून पडली. त्यामुळे त्यांचे जवळपास ५० हजाराचे नुकसान झाले. काजळेश्वरातही काहींच्या घरावरील टिनपत्रे उडून गेल्याने घराला क्षती पोहचली तर सिमेंट खांब ही पडल्याने विस्कळीतपणा आला तेव्हा महसूल विभागाने नुकसानग्रस्त झाडाचे सर्वेक्षण करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी शुभम सुपनर अवीनाश भिंगारे ; नितीन पाटील उपाध्ये यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांसाठी ग्रामपंचायत स्तरावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करा.

### (मनसेची कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी)

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

**राळेगावः -** शेतकऱ्यांना शेतीमध्ये पिके घेण्यास अनेक अडचणी येत असल्याने कोणते बियाणे , खते,कीटकनाशके वापरण्यात यावी,उत्पादन वाढीसाठी कोणते प्रयोग शेतात करावे? याकरिता मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने ग्राम पंचायत स्तरावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात यावे अशी मागणी मनसेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.गेली कित्येक वर्षापासुन शेतकऱ्यांच्या पाठीमागे संकटाची मालीका कायम आहे, तालुक्यातील शेतकरी एका पाठोपाठ एक अनेक संकटाचा सामना करीत असतांना मागील काही वर्षापासुन फवारणीतुन विषबाधा होऊन अनेकांना आपले प्राण सुद्धा गमवावे लागले तसेच ही शाई वाळते न वाळते तोच गुलाबी बोंड अळी, बोंडसडने आक्रमण करून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले. मात्र कृषी विभागाकडुन आत्तापर्यंत कुठल्याही प्रकारचे तालूक्यात या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले नाही. चालु वर्षात तालुक्यातील शेतकरी पिक पेरणी बाबत संभ्रमावस्थेत असतांना बदलत्या हवामानानुसार कोणते बियाणे,खते,कीटकनाशके वापरण्यात यावी,मातीचा पोत कसा तपासावा याकरिता कृषी विभागाकडुन राळेगाव तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करून जगाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

तालुका कृषी कार्यालया अंतर्गत असलेल्या मंडळ कृषी अधिकारी हे आपल्या कार्यक्षेत्रात दौरा,शिवार भेट,किंवा मार्गदर्शन शिबिर न घेता सर्व कागदोपत्री दाखवुन शासनाच्या निधीची लूट करीत आहेत.त्यामुळे मागील काळात घेण्यात आलेल्या सर्व कार्यशाळा,मार्गदर्शन शिबिराची माहिती घेतल्यास सर्व गौड बंगाल बाहेर येईल.
**शंकर वरघट (उपजिल्हाध्यक्ष मनसे यवतमाळ)**




## लांजा तालुक्यातील गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनतर्फे कोकण कन्या सृष्टी कुळये यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

सृष्टी कुळये ही मूळची रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील शिरवली (पलीकडचीवाडी )येथील राहणारी,सध्या ती मुंबईत राहते.तिचे वडील सुरेश कुळये हे मुंबईत एका प्रिंटिंग प्रेसमध्ये मशीन ऑपरेटर म्हणून काम करतात,तर आई गृहिणी आहे. सृष्टी हिला दोन भावंडे असून,ती या सर्वात मोठी आहे. घरची परिस्थिती बेताची आहे, तरीही सृष्टी हिने केवळ जिद्द, चिकाटी आणि प्रचंड मेहनत या त्रिसूत्रीच्या जोरावर सृष्टी हिने यूपीएससीमध्ये यश संपादन करत देशात ८३१ रँक मिळवली. लेकीने (सृष्टी )मिळविलेल्या यशानंतर आई-वडिलांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कु.सृष्टी कुळये हिचे तिच्या मानखुर्द येथे राहत्या घरी जाऊन लांजा तालुक्यातील शिक्षण,समाजसेवा, ग्रामसेवा, तंटामुक्त, कृषीसेवा, शेती विकास, कामगार, उद्योग, साहित्य, कला, क्रीडा, ग्रंथपालन,



पर्यावरण आदी क्षेत्रात कार्यरत असलेल्या गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक डॉ.श्री. चंद्रकांत शिवराम करंबळे,वकील श्री.मनोहर मांडवकर,गुरुमाऊली फाउंडेशनच्या सदस्य सौ.दिपाली करंबळे, कुमारी निशा मांडवकर व सृष्टीचे आई वडील यांच्याकडून पुष्पगुछ,शाल आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच तिच्याशी आणि तिच्या परिवाराशी सुसंवाद साधण्यात आला.तिच्या UPSC स्पर्धा परीक्षेबद्दलचा प्रवास, तिने केलेली मेहनत इ.गोष्टीची माहिती घेऊन उपस्थित सभासदांनी तिला मंडळातर्फे अभिनंदन आणि शुभेच्छा व्यक्त केल्या. हा कार्यक्रम श्री.चंद्रकांत करंबळे यांच्या माध्यमातून पार पडला.त्यामुळे उपस्थित सभासद यांचे यानिमित्ताने आभार व्यक्त करण्यात आले.सृष्टीला यश, कीर्ती आणि दीर्घ आयुष्य देवो हीच प्रार्थनाही या सत्कार दरम्यान करण्यात आली.समाजाची मुलगी म्हणून समाजसेवक चंद्रकांत करंबळे यांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले होते. सध्या सृष्टी मुंबईतील मानखुर्द शिवनेरीनगर येथील झोपडपट्टीत राहत असल्याने या ठिकाणी तिचा अभ्यास होत नव्हता. त्यामुळे तिने सन २०२२ मध्ये गोवंडी येथील एम.पॉवर लायब्ररीत प्रवेश घेतला. घरात कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक वातावरण नाही.घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे कोणतीही शिकवणी नाही. अशा परिस्थितीतही सृष्टी हिने केवळ इच्छाशक्ती आणि अभ्यासाच्या जोरावर गरुडझेप घेतली. तिने मिळविलेल्या या यशानंतर त्याच्या परिवारातर्फेआणि अनेक ग्राम मंडळ, मुंबई मंडळ यांच्यातर्फे तिचा सत्कार करण्यात आला. घरच्या परिस्थितीची कल्पना होती.आई-वडिलांचे कष्ट पाहत होते. त्यामुळे चांगले शिकायचे आणि मोठे व्हायचे हे मनाशी ठरविले होते. त्यासाठी आई- वडील, माझे मार्गदर्शक शिक्षक, मला प्रोत्साहन देणारे हितचिंतक यांचे पाठबळ मिळाले. या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे मी हे यश मिळवू शकले असे सृष्टी कुळये यांनी सत्कारला उत्तर देताना स्पष्ट केले. या यशा बद्दल लांजा तालुका मधील अनेक मंडळ, समाज शाखा यांच्या तर्फे सृष्टी यांना अनेकांकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## अनधिकृत शाळेच्या कारनाम्यांचा पर्दाफाश ; सनशाईन इंटरनॅशनल स्कूलवर शिक्षण हक्क कायद्याची टांगती तलवार

### बेकायदेशीर पणे आदिवासी जमिनींचा वापर ; त्या जमिनींवर बांगलादेशी घुसखोरांच वास्तव्य...

**दैनिक युवक आधार**
**शाबीर शेख**
**खालापूर, वार्ताहर**

खालापूर तालुक्यातील खोपोली नगर पालिका हद्दीत अनधिकृत शाळा म्हणून भारती अकॅडेमी नंतर आदिवासी जमिनीवर सनशाईन इंटरनॅशनल स्कूल अनधिकृतरित्या चालविली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पंचायत समिती खालापूरच्या शिक्षण विभागाने या शाळेला ८ मे २०२५ रोजी नोटीस बजावून शिक्षण हक्क कायदा २००९ अंतर्गत कडक कारवाईचा इशारा दिला आहे.पण नोटीस काळ संपल्या नंतर हि ना गुन्हा दाखल केला ना दंड वसूल करण्यात आला.या शाळेने मान्यतेची कोणतीही कागदपत्रे सादर न केल्याने आणि प्रशासनाच्या वारंवार सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने ही कारवाई अटळ ठरली आहे. या प्रकरणाने शाळा प्रशासनाच्या गलथान कारभारावर आणि मुलांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या अनधिकृत शाळांच्या धोक्यावर पुन्हा एकदा प्रकाशझोत टाकला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (RTE ACT) अंतर्गत, कोणतीही शाळा शासनाच्या मान्यतेशिवाय चालविता येणार नाही. कलम १८(५) नुसार, मान्यता नसलेल्या शाळांना १ लाख रुपये दंड आणि त्यानंतरही शाळा सुरू ठेवल्यास प्रतिदिन १० हजार रुपये दंड आकारला जाऊ शकतो. सनशाईन इंटरनॅशनल स्कूलने खोपोली नगरपरिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने मागणी केलेली कागदपत्रे सादर न करून कायद्याचा स्पष्ट भंग केला आहे. प्रशासनाने ३० एप्रिल २०२५ रोजी पत्राद्वारे शाळेला मान्यतेची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले होते, परंतु शाळा प्रशासनाने याकडे बेजबाबदार पणे पूर्णपणे कानाडोळा केलेला दिसत आहे. सनशाईन इंटरनॅशनल स्कूलसारख्या अनधिकृत शाळा मुलांच्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा आणतात. त्यांना असुरक्षित करतात. RTE कायद्याच्या कलम ९ नुसार, स्थानिक प्राधिकरणांना (जसे की पंचायत समिती, नगरपरिषद)




सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळेल याची खात्री करणे बंधनकारक आहे. अशा शाळा मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याऐवजी केवळ आर्थिक नफ्याच्या मागे धावतात. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच, शिवाय त्यांच्या प्रमाणपत्रांना कायदेशीर मान्यता नसल्याने भविष्यातील संधींवरही परिणाम होतो. सनशाईन इंटरनॅशनल स्कूलच्या या गैरप्रकारांमुळे स्थानिक नागरीक पालकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे, ज्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठ्या रकमेची गुंतवणूक केली ते आता विद्या मंदिर म्हणून पावित्र्य ठिकाणी जर असे बेजबाबदार कार्य होत असेल आमची मुले असुरक्षित असतील तर जिल्हाधिकारी ,स्थानिक शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन का कारवाई करीत नाही असा प्रश्न विचारत आहे. ाळा प्रशासनाची उदासीनता आणि बेजबाबदार वृत्ती यामुळे हे प्रकरण आणखी गंभीर बनले आहे. खोपोली नगरपरिषदेने वारंवार सूचना देऊनही शाळेने कोणताही प्रतिसाद दिला नाही.ही अत्यंत निंदनीय बाब ठरत आहे. यावरून शाळा प्रशासनाला कायद्याची भीती नाही आणि विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा स्वतःच्या फायद्याला प्राधान्य आहे, हे स्पष्ट होते. अशा शाळा स्थानिक प्रशासनावर दबाव टाकून किंवा कायदेशीर प्रक्रियेत अडथळे आणून आपले गैरप्रकार लपविण्याचा प्रयत्न होत आहेत . बेजबाबदार सनशाईन इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापनाने या प्रकरणात पारदर्शकतेचा अभाव दाखवला असून, त्यांच्या गलथान कारभारामुळे मुलांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. म्हणून त्या शाळेच्या मुख्याध्यापक व संस्था चालक तसेच जमीन मालक यावर बदलापूर अक्षय शिंदे सारखा निंदनीय प्रकार होऊ नये किंवा त्या शाळेत कोणी बांग्लादेशी कर्मचारी घात पात अमानवीय असा अनुचित प्रकार करू नये याची आधीच दक्षता घेऊन शाळेवर कठोर कारवाई करून तातडीने आजमीन पात्र गुन्हे दाखल व्हावा असे स्थानिक नागरिकांची मागणी आहे. पंचायत समिती खालापूरच्या गट शिक्षणाधिकारी किशोर चौरमाले यांनी शाळेला नोटीस बजावून तीन दिवसांत मान्यतेची कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. पण शाळा बंद केली नाही , दंडात्मक कारवाई केली नाही ,तहसील कार्यालय,खोपोली नगरपरिषदेने स्थानिक प्रशासनाने या प्रकरणात तत्परता दाखवली असली, तरी अशा अनधिकृत शाळांचा शोध घेऊन त्यांच्यावर वेळीच कारवाई झाली असती पण का विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी हे सर्व जवाबदार घटक खेळत आहे असा चिंता जनक प्रश्न उपस्थित होतो. या प्रकरणाने पालकांना शाळा निवडताना सावध राहण्याची गरज अधोरेखित केली आहे. शाळेची मान्यता, संस्थाचालक व शिक्षक इतर कर्मचारी वर्गाचा चारित्र्य प्रमाणपत्र, शिक्षकांचे दर्जा आणि सुरक्षिततेसाठी सुविधांची उपलब्धता याची खात्री करणे पालकांचे कर्तव्य आहे. तसेच, समाजाने निर्भीडपणे बेकायदेशीर पद्धतीने विद्या मंदिराची पावित्रता मल्लीन करणाऱ्या अशा अनधिकृत शाळांविरोधात आवाज उठवून स्थानिक प्रशासनाला कारवाईसाठी बाध्य करणे आवश्यक आहे. शिक्षण हा मुलांचा मूलभूत हक्क आहे आणि तो कोणत्याही परिस्थितीत हिरावला जाऊ नये. व स्वयंघोषित शिक्षण महर्षी होणाऱ्यांना आळ बसावा हेही तितकेच महत्त्वाचे आहे. सनशाईन इंटरनॅशनल स्कूलच्या अनधिकृत कारभाराने शिक्षण क्षेत्रातील कार्यपद्धतीवर गंभीर त्रुटी समोर आणल्या आहेत. शाळा प्रशासनाच्या बेजबाबदार वृत्तीमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असून, पालकांचा विश्वासही डळमळीत झाला आहे. पंचायत समिती खालापूर आणि खोपोली नगरपरिषदेने या प्रकरणात कठोर कारवाई करून अशा शाळांना चाप लावणे गरजेचे आहे. शिक्षण हक्क कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून मुलांचे भविष्य सुरक्षित करण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. हा प्रकार केवळ सनशाईन इंटरनॅशनल स्कूलपुरता मर्यादित नसून, इतर अनधिकृत शाळांवरही कारवाईची गरज आहे, जेणेकरून शिक्षणाचा पाया खचणार नाही. अश्या शाळेत भविष्यामध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडल्यास त्या वेळच्या निंदनीय घटनेला गटशिक्षणाधिकारी, शाळा चालक ते स्थानिक प्रशासन जवाबदार राहील अशी भूमिका महाराष्ट्र राज्य सरकारने तातडीने घ्यावी असे पत्र अनेक सामजिक संघटनेच्या वतीने देण्यात येणार असल्याचे साबीर शेख यांनी सांगितले.